RNI No.: MAHBIL/2016/68485

www.acrossstates.com

मराठी अक्रॉस मुंबई

संपादक - संजय मंगेश भैरे

वर्ष: ११ अंक :२१ ■ मुंबई, मंगळवार २१ ते २७ एप्रिल २०२६

मूल्य - ५.०० रुपये ■ पाने - ८

जोगेश्वरीतील ट्रॉमा केअर रुग्णालयाजवळ 'मिनी फायर स्टेशन' उभारण्याची खा. रवींद्र वायकर यांची मागणी

पान २ वर

आवश्यक वीजनिर्मिती व सुरळीत वीज पुरवठ्यासाठी यंत्रणा सज्ज

पान ३ वर

"संस्कृत देशाचा आत्मा, सर्वांनी शिकायला हवी"

मोहन भागवत यांचे देशवासीयांना मोठे आवाहन

नवी दिल्ली वृत्तसंस्था



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी सोमवारी संस्कृत भाषा शिकण्याच्या महत्त्वावर भर दिला. संस्कृतला भारताचा 'खरा आत्मा' आणि देशाच्या सांस्कृतिक सातत्याचा एक आवश्यक घटक असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. ते दिल्लीतील 'संस्कृत भारती'च्या मध्यवर्ती कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. ही संस्था संस्कृतला एक जिवंत आणि व्यापकपणे वापरली जाणारी भाषा म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी समर्पित आहे.

कार्यक्रमाला संबोधित करताना भागवत म्हणाले, "संस्कृत ही केवळ एक भाषा नाही. भारतात संस्कृत राष्ट्राचा आत्मा आहे, कारण ती विचार, जीवन आणि संस्कृतीची सर्वात प्राचीन परंपरा आहे, जी आजही जिवंत आहे." भारताच्या वैचारिक संकल्पनेवर भाष्य करताना ते म्हणाले, "भारताचे अस्तित्व केवळ भौगोलिक वास्तव नाही. ती केवळ राजकीय किंवा आर्थिक संस्था नाही. भारत ही एक जिवंत परंपरा आहे, ज्या पायावर जीवनाचे सातत्य अवलंबून आहे."

भारतीयांना कर्तव्य पूर्ण करायचं असेल तर भारताला समजून घ्यावं लागेल, स्वतःला भारत व्हावं लागेल. भारताला समजून घ्यायचं असेल तर संस्कृतला समजून घेणं अनिवार्य आहे, असं मोहन भागवत म्हणाले.

आपल्या बालपणातील आठवणी सांगताना भागवत म्हणाले, "माझ्या लहानपणी जेव्हा शाळेत संस्कृत शिकवले जायचे, तेव्हा ते कठीण वाटायचे. अभ्यासक्रमात 'श्लोक' पाठ करावे लागत, ज्यामुळे संस्कृत ही एक अवघड भाषा असल्याचा समज निर्माण झाला. मात्र, तेच श्लोक जेव्हा घरात नैसर्गिकरित्या ऐकायला मिळायचे, तेव्हा ते कधीच कठीण वाटले नाहीत."

ते पुढे म्हणाले, "हीच समस्या आजही कायम आहे; विद्यार्थ्यांना संस्कृत ही कठीण भाषा वाटते. पण प्रश्न असा उरतो की ती इतकी कठीण का वाटते? वास्तविक, भाषा शिकण्याची सर्वात सोपी आणि प्रभावी पद्धत ही पाठ्यपुस्तके नसून संवाद आहे." भाषा शिकणे हे वातावरणातून आणि नियमित वापरामुळे सोपे होते, यावर त्यांनी भर दिला.

सरसंघचालक पुढे म्हणाले, "मी जेव्हा भारतभर प्रवास करतो, तेव्हा मला विविध प्रादेशिक भाषांमधील विशिष्ट शब्द माहीत नसले तरी, त्यामागील भावना आणि अर्थ समजून घेणे मला शक्य होते. सतत ऐकल्याने आणि बोलल्याने भाषा नैसर्गिकरित्या आत्मसात केली जाते. त्यामुळे भाषा शिकण्याची सर्वोत्तम पद्धत म्हणजे ती भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये मिसळणे, त्यांचे ऐकणे आणि सतत बोलणे हीच आहे."

महिलांना आरक्षण मिळेपर्यंत स्वस्थ बसणार नाही - मुख्यमंत्री

मुंबई, प्रतिनिधी

देशाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा दिवस ठरेल, अशी १७ एप्रिल रोजी अपेक्षा होती. महिला आरक्षण विधेयक मंजूर होईल आणि सर्वजण त्यास पाठिंबा देतील, अशी आशा होती. मात्र, डीएमके, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, समाजवादी पक्ष, उबाठा आणि काँग्रेस यांनी महिला विरोधी मानसिकतेचे प्रदर्शन केले, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. लोकसभेत महिला आरक्षण विधेयक फेटाळल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेतली. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या खासदार ज्योती वाघमारे, नेत्या नीलम गोऱ्हे, मंत्री मेघना बोर्डीकर, मंत्री आदिती तटकरे, भाजप आमदार चित्रा वाघ, मुंबईच्या महापौर रितू तावडे आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण उपस्थित होते.

महिला विधेयकाची विरोधकांकडून भ्रूणहत्या करण्यात आली. त्यानंतर आनंदोत्सवही साजरा करण्यात आला. हे समाजसुधारकांच्या विचारांवर केलेले तांडव होते. महात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जयंती सुरू आहे. मात्र, त्यांच्या विचारांना तिलांजली देण्याचे काम झाले. हे सर्व पक्ष उघडे पडले आहेत, अशी टीका फडणवीस यांनी केली. लोकशाहीतील महिला सहभागाचा मृत्यू झाला असून, त्याचे मारेकरी विरोधी पक्ष आहेत, असा घणाघातही त्यांनी केला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, १९७६ मध्ये देशात मतदारसंघ पुनर्रचना झाली. संविधान दुरुस्ती करून १९७१ ची लोकसंख्या आधार मानत २००० सालापर्यंत पुनर्रचना होणार नाही, असा निर्णय झाला. २००२ मध्ये आयोग स्थापन झाला. दक्षिण भारतावर अन्याय होऊ नये म्हणून त्यावेळी आणखी २० वर्षांची मुदतवाढ देण्यात आली. १९७१ च्या लोकसंख्येच्या आधारेच पुनर्रचना करण्यात आली.

२०२३ मध्ये महिला आरक्षणासाठी संविधान दुरुस्ती झाली. जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचना यांची अट ठेवून हा निर्णय झाला. सर्व आकडेवारी येईपर्यंत २०२८ वर्ष उजाडेल. मात्र, २०२३ च्या निर्णयानुसार पुनर्रचना करून कोणत्याही परिस्थितीत २०२९ मध्ये महिला आरक्षण लागू होईल आणि महिला निवडून येतील.

लोकसभेत ५४३ जागा असतील, असा निर्णय १९७१ मध्ये झाला होता. त्यावेळी देशाची लोकसंख्या ४५ कोटी होती. आता ती १४० कोटींवर पोहोचली आहे. लोकप्रतिनिधित्व कायद्याशी अन्याय होऊ नये आणि उत्तर-दक्षिण वाद संपावा, यासाठी या विधेयकात प्रयत्न करण्यात आले होते, असेही त्यांनी सांगितले.

काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांची प्रवृत्ती नेहमीच महिला विरोधी राहिली आहे. त्यांनी सातत्याने महिला विरोधी धोरणे राबवली, असा आरोप फडणवीस यांनी केला.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याबाबत विचारले असता फडणवीस म्हणाले की, एखादा माणूस किती खोटे बोलू शकतो, याची जर ऑलिम्पिक स्पर्धा झाली तर राहुल गांधींशिवाय दुसऱ्याला पदक मिळणार नाही. सर्व सुवर्णपदके त्यांनाच मिळतील.

संविधान तयार होत असताना महिला प्रतिनिधित्वाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चिंतेत होते. आता त्याच विचारांच्या अनुषंगाने कायदा आला असताना तो पाडण्याचे काम करण्यात आले. राहुल गांधी यांना महिलांचा आणि इतर घटकांचा अपमान करण्याची सवय आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

प्रियांका गांधी यांनी केलेल्या आरोपांबाबत विचारले असता फडणवीस म्हणाले की, मी त्यांना दोष देणार नाही. त्या नव्या आहेत. त्या २०२३ नंतर आल्या आहेत. २०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक मंजूर झाले तेव्हा मतदारसंघ पुनर्रचना आणि आरक्षण तत्काळ लागू होणे शक्य नव्हते. कदाचित त्यांना हे समजावून सांगितले गेले नसेल.

ओबीसी जनगणना निश्चित आहे. मोदी सरकारने जातनिहाय जनगणना मान्य केली आहे. ओबीसींबद्दल इतके प्रेम होते, तर १९७० नंतर जनगणना करा, अशी मागणी वारंवार होत होती. मात्र, त्यांनी ती केली नाही, असेही त्यांनी म्हटले.

सर्व राज्यांत प्रमाणानुसार जागा वाढत आहेत. वेगवेगळी कारणे शोधण्याचा हा प्रयत्न आहे. महिला आरक्षण २०२९ मध्ये लागू होईल आणि महिला सर्वांना वठणीवर आणतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

विरोधकांनी माझ्याशी खुली चर्चा करावी

गृहमंत्र्यांनी सांगितले की, आम्ही बदल करू, तुम्ही पाठिंबा द्या. मात्र, त्यानंतर विरोधकांची बोलती बंद झाली. भाजपवर आरोप करणाऱ्यांनी राजस्थान, गुजरात, दिल्लीसारख्या ठिकाणी भाजपने महिला मुख्यमंत्री दिल्या, हे पाहावे. या लोकांनी कधीही महिलांना मुख्यमंत्री होऊ दिले नाही, असे ते म्हणाले.

माझ्या स्तरावरील कोणत्याही नेत्याने माझ्याशी खुली चर्चा करावी. हे माझे आव्हान आहे. मात्र, ते तसे करणार नाहीत. ते पळ काढतात, असेही त्यांनी म्हटले.

राज्यातून एक कोटी महिलांच्या सह्या गोळा करणार

आम्ही आता महिलांचे एकत्रीकरण करणार आहोत. लोकशाहीतील जनमताचा दबाव त्यांना समजेल. त्यानंतर ते महिला आरक्षणाला पाठिंबा देतील. महिलांना संघटित करण्याचे काम करू. राज्यातून एक कोटी महिलांच्या सह्या गोळा करणार आहोत. जनजागृती मोहीम राबवणार आहोत. आम्ही मेळावा बोलावला असून, त्यात मित्रपक्षांनाही निमंत्रित करू. उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि काँग्रेसचा महिला विरोधी चेहरा आम्ही उघड करू. महिलांना आरक्षण मिळेपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

फडणवीसांवर दिल्लीतून प्रेशर आले असेल - सुप्रिया सुळे

याबाबत बोलताना सुप्रिया सुळे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर दिल्लीतून दबाव असल्यामुळे त्यांना तसे बोलावे लागत असेल, अशी टिप्पणी केली. त्या सोमवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या.

विरोधी पक्ष हे महिला विरोधी आहेत, असे सांगून काही होणार नाही. मला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून जास्त अपेक्षा होत्या. कारण देवेंद्र फडणवीस हे सुशिक्षित, हुशार आहेत, ते खूप वाचनही करतात. त्यामुळे मुख्यमंत्र्यांकडून माझी अपेक्षा वेगळी होती. पण एनडीए आघाडीतील सर्व पक्षांनाच एक ब्रिफिंग दिले जाते, त्यांना एक नोट पाठवली जाते. ते स्वतःच्या मित्रपक्षांनाही नोट पाठवतात आणि सगळे त्या मुद्द्यावर एकाच सुरात बोलतात. देवेंद्र फडणवीस हे अभ्यासू नेते आहेत. महिला आरक्षण विधेयक हे २०२३ मध्येच पास झाले आहे हे देवेंद्र फडणवीस यांना २००० टक्के माहिती आहे. पण दिल्लीवरुन त्यांना नोट आली असेल किंवा प्रेशर आलं असेल पक्षाची हीच लाईन लावून धरा, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले. नारीशक्ती वंदन अधिनियम जो निर्णय घेतला, तो संसदेत २० सप्टेंबर २०२३ला एकमताने मंजूर झाला होता. २१ तारखेला हे विधेयक राज्यसभेतही मंजूर झाले. त्यानंतर २८ सप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रपतींनी त्यावर स्वाक्षरी केली. त्याची अंमलबजावणी २०२४ला झाली पाहिजे होती. आम्ही या क्षणापासून महिला आरक्षण लागू करा, हे ठामपणे सांगतोय. लोकसभेच्या ५४३ जागांमध्ये ३३ टक्के महिलांना लगेच आरक्षण द्या, हा आमचा आग्रह आहे. मुख्यमंत्र्यांना मला विचारायचे आहे, २०२३ साली मंजूर झालेले विधेयक २०२६ उजाडले तरी लागू का झाले नाही? डिलिमिटेशन आणि महिला आरक्षणाचा संबंध काय? ५० टक्के जागा प्रत्येक राज्यात वाढवणार असं आम्हाला सांगितले होते. मग ते विधेयकात का नव्हते? मुख्यमंत्री महिला आरक्षणाबाबत खोटं बोलत आहेत, असे मला म्हणायचे नाही. मात्र, यासंदर्भात त्यांच्याशी चर्चा करण्याची माझी तयार आहे. मुख्यमंत्री म्हणतील ती जागा आणि वेळ मला मान्य आहे, असे सांगत सुप्रिया सुळे यांनी एकप्रकारे देवेंद्र फडणवीसांनी विरोधकांना दिलेले आव्हान स्वीकारले.

७.७ तीव्रतेचा भीषण भूकंप

जपानमध्ये त्सुनामीचा इशारा

टोकियो, वृत्तसंस्था

जपानच्या ईशान्य किनारपट्टीला सोमवारी रिश्टर स्केलवर ७.७ तीव्रतेच्या शक्तिशाली भूकंपाचा धक्का बसला. या भूकंपानंतर प्रशासनाने तातडीने त्सुनामीचा इशारा जारी केला असून, समुद्रकिनाऱ्यालगतच्या हजारो नागरिकांना उंच ठिकाणी जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. भूकंपाची तीव्रता लक्षात घेता बुलेट रेल्वे सेवा ठप्प झाली असून अणुऊर्जा प्रकल्पांची सुरक्षा तपासणी सुरू करण्यात आली आहे. भूकंपाचे केंद्रस्थान पॅसिफिक महासागरातील सनरिकु किनाऱ्याजवळ १० किलोमीटर खोलीवर असल्याचे सांगितले जात आहे.

जपानच्या हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, इवाते प्रांतातील कुजी बंदरात ८० सेंटीमीटर उंचीच्या, तर इतर भागांत ४० सेंटीमीटर उंचीच्या त्सुनामी लाटांची नोंद झाली आहे. मात्र, ३ मीटरपर्यंत उंच लाटा धडकण्याची शक्यता असल्याने ओत्सुची आणि कामाईशी यांसारख्या बंदर शहरांतील रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवण्यात येत आहे. 'त्सुनामी! तात्काळ बाहेर पडा!' असे इशारे दूरचित्रवाणी वाहिन्यांवर झळकत असून नागरिक सुरक्षिततेसाठी धावपळ करताना दिसत आहेत.

जम्मू-काश्मीरमध्ये यात्रेकरुंच्या बसचा भीषण अपघात; २१ ठार, ६१ जखमी

उधमपूर, वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरमध्ये यात्रेकरुंच्या बसचा भीषण अपघात झाला असून या दुर्दैवी घटनेत २१ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. उधमपूरमध्ये झालेल्या बस अपघाताने संपूर्ण देशाला हादरवून सोडले असून रामनगरच्या कागोत परिसरात ही बस अनियंत्रित झाल्याने पलटी झाली. या दुर्घटनेत बसमधील २१ यात्रेकरु ठार झाले असून ६१ प्रवाशी जखमी झाल्याची माहिती आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत मदत आणि बचाव कार्य सुरू आहे, अपघातातील जखमींना जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींसह काँग्रेस नेत्या प्रियांका गांधीनी देखील घटनेवर दुःख व्यक्त केले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यात्रेकरुन प्रवाशांची बस रामनगरहून उधमपूरला जात होती, त्याचवेळी जालो क्षेत्राजवळ चालकास बस अनियंत्रित होऊन हा अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार बसचे टायर फुटल्याने आणि वेगामुळे बस अनियंत्रित होऊन पलटी झाली. मात्र, अपघाताची नेमकी कारणे, आणि सखोल माहिती घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. दरम्यान, या घटनेवर देशभरातून हळहळ व्यक्त होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उधमपूर अपघाताच्या घटनेवर शोक व्यक्त केला. "या दुर्घटनेत लोकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करतो, अपघातामधील जखमी लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबीयांना २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत देण्यात येईल, असे ट्विट पंतप्रधान मोदींनी केले आहे.

काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनीही अपघाताच्या घटनेवर शोक व्यक्त करत मृतांना श्रद्धांजली वाहिली. उधमपूर बस दरीत कोसळल्याने अनेक प्रवाशांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. मृतात्म्यांना शांती मिळावी यासाठी प्रार्थना, शोकग्रस्त कुटुंबांप्रती संवेदना व्यक्त करतो. तसेच जखमी लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना, असे ट्विट प्रियंका गांधी यांनी केले.

चाकणकरांनी तपासात सहकार्य करावे

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकरांचा सल्ला

मुंबई, प्रतिनिधी

भोंदूबाबा अशोक खरातच्या प्रकरणामुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडालेली आहे. त्याने केलेले महिलांचे शोषण तसेच त्याच्या कथित आर्थिक गैरव्यवहारांची एक-एक प्रकरणं थक्क करणारी आहेत. तो सध्या कोठडीत असून त्याची कसून चौकशी केली जात आहे. खरातचे प्रकरण समोर आल्यानंतर त्याच्या जवळच्या वर्तुळात असणाऱ्या अनेक राजकीय नेत्यांवर वेगवेगळे आरोप करण्यात आले. रुपाली चाकणकर यांना तर महिला आयोगाचे अध्यक्षपद आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्षपदही गमवावे लागले. त्यांच्यावर अटकेची कारवाई करा, अशी मागणी केली जात आहे. पोलिसांनीही त्यांना समन्स बजावले होते. असे असतानाच आता राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी या प्रकरणावर पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी रुपाली चाकणकर यांना एक सल्ला दिला आहे. या प्रकरणात जे दोषी आहेत, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. या संपूर्ण प्रकरणात रुपाली चाकणकर यांच्यावर आरोप झाले. त्यानंतर चाकणकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिलेला आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. एसआयटी आपले काम करत आहे. महाराष्ट्र पोलीस अत्यंत निपक्ष:पातीपणे या संपूर्ण प्रकरणाचा तपास करतील, असा विश्वास विजया रहाटकर यांनी व्यक्त केला. तसेच, पोलीस ज्या-ज्या वेळेला चाकणकर यांना चौकशीसाठी बोलावतील, त्या-त्या वेळेला चाकणकर यांनी चौकशीसाठी जायला हवे, असे मत विजया रहाटकर यांनी व्यक्त केले. तसेच पोलिसांना त्यांनी सहकार्य करणे अत्यंत आवश्यक आहे. चाकणकर यांनी पोलिसांना सहकार्य करावं, असं आवाहनही त्यांनी केलं.

नेस्को अमली पदार्थप्रकरणी रिपब्लिकन पक्षाची कठोर मागणी

वनराई पोलीस ठाण्यावर रिपब्लिकन पक्षाचे धडक निदर्शन

मुंबई - प्रतिनिधी

गोरेगाव पूर्व येथील नेस्को संकुलात ११ एप्रिल २०२६ रोजी आयोजित लाईव्ह म्युझिक कॉन्सर्टमध्ये अमली पदार्थांच्या (ड्रग्स) अतिसेवनामुळे दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना दुर्दैवी नसून, मुंबईच्या कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित करणारी आहे. या संकुलात यापूर्वीही अनेक लाईव्ह म्युझिक कॉन्सर्ट आणि पार्ट्यांचे आयोजन केले जाते, ज्यात हजारो युवक-युवती सहभागी होतात. या कार्यक्रमांमध्ये सर्रास अमली पदार्थांचे सेवन व विक्री होत असल्याचे दिसून येते.

या प्रकारच्या मोकळ्या जागेतील कार्यक्रमांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका, अग्निशमन दल, पोलीस प्रशासन व इतर प्रशासकीय परवानग्या रितसर घेतल्या जातात का, याबाबत गंभीर संशय व्यक्त करण्यात येत आहे. परवानग्या घेतल्या असतील तर त्यांची पायमल्ली झालेली असावी, असा आरोप करण्यात येतो.

या प्रकरणात मिळालेल्या माहितीनुसार, ११ एप्रिल २०२६ रोजी शनिवारी नेस्को संकुलात आयोजित कॉन्सर्टमध्ये तीन ते चार हजार तरुण-तरुणींची गर्दी होती. अत्यधिक मद्यपान व अमली पदार्थांच्या सेवनामुळे काहींची प्रकृती बिघडली. दोघांना जोगेश्वरीतील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालयात व एका तरुणाला गोरेगाव पश्चिम येथील लाईफ लाईन रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान दोघांचा मृत्यू झाला. ट्रॉमा केअरमध्ये दाखल एका तरुणीला डिस्चार्जनंतर मुंबईतील खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले, जिथे सोमवारी तिचाही मृत्यू झाला. दुसऱ्या तरुणीवर अद्याप उपचार सुरू आहेत व तिची प्रकृती गंभीर असल्याचे कळते.

या गंभीर प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. आयोजक व जागेच्या मालकावर मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत. नेस्को सारख्या प्रतिष्ठित ठिकाणी ड्रग्सचा खुले आम वापर होतो आणि ८० टक्के युवक-युवती विद्यार्थी नशेत असतात, याचा अर्थ आयोजक व जागामालक पैसा कमावण्याच्या हेतूने युवक-युवतींच्या जिवनाशी खेळत सर्व नियम धाब्यावर बसवत असल्याचे स्पष्ट होते.

रिपब्लिकन पक्षाची प्रमुख मागण्या:

- नेस्को संकुल मालकावर (ज्यांनी कोणतीही प्रशासकीय परवानगी न पाहता संकुल भाड्याने दिले) व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा.
- केवळ ड्रग्ज पुरवठादारांवर नव्हे, तर आयोजक व जागामालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.
- सर्व आरोपींवर मोक्का सारखी कठोर कलमे लावून कारवाई करावी.
- भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी नेस्को संकुलातील सभागृहांची संख्या, क्षेत्रफळ, बांधकाम परवानग्या, बॅन्क्वेट हॉल्सना दिलेल्या परवानग्या यांची सखोल तपासणी करावी.
- संकुलातील पार्किंग क्षेत्राची क्षेत्रफळ व बृहन्मुंबई महानगरपालिकेची परवानगी याचीही पाहणी करावी.
- या सर्व बाबींची सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी, जेणेकरून भविष्यात असे प्रकार घडणार नाहीत.
- तोपर्यंत नेस्को संकुलातील कार्यक्रमांना पोलीस प्रशासनाने परवानगी देऊ नये.

या मागण्यांसाठी रिपब्लिकन पक्ष गोरेगाव विधानसभा व उत्तर-पश्चिम मुंबई जिल्हा महिला आघाडीच्या वतीने १७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता वनराई पोलीस ठाणे येथे निदर्शन आंदोलन करण्यात आले. निवेदनाद्वारे मागण्या सादर करण्यात आल्या.

आंदोलनाचे नेतृत्व: रिपब्लिकन पक्ष महिला आघाडी राष्ट्रीय सचिव संगीता कापुरे, उत्तर-पश्चिम मुंबई जिल्हाध्यक्ष रेश्मा खान, गोरेगाव तालुका अध्यक्ष रमेश पाईकराव यांनी केले. यावेळी उत्तर-पश्चिम मुंबई जिल्हा उपाध्यक्ष विश्वास गजघाटे, गवळणताई जाधव, सचिव शोभा धबाले, मंगल शिंदे, जया पडवळ, महिला गोरेगाव तालुका अध्यक्ष छायाताई राऊत, दिंडोशी तालुका सरचिटणीस संगीता मोरे, मंदाताई आचार्य, कुसुम अहीरे, सरोज सिंह, कीशाताई सौदरमल, दुर्गावती भगत, जोगेश्वरी तालुका सरचिटणीस मा. इब्राहिम शेख, युवक गोरेगाव तालुका अध्यक्ष दीपक सहेजराव, सचिव तानाजी साळवे, उपाध्यक्ष रामकृपाल पासवान, वार्ड अध्यक्ष अकबर सय्यद, विजय धबाले, सरचिटणीस संतोष वारकरी, मा. देविदास मोरे, दादाराव लोखंडे, अशोक सहेजराव व गोरेगाव विधानसभेतील अनेक नागरिक उपस्थित होते.

या प्रकरणाची सखोल चौकशी व दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी रिपब्लिकन पक्षाची ठाम भूमिका आहे. युवक-युवतींच्या सुरक्षिततेसाठी व ड्रग्स मुक्त वातावरणासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात येत आहे.

अंधेरीतील कामगार रुग्णालय पुनर्निर्माण कामातील प्रदीर्घ विलंब व अनियमितता

खासदार रवींद्र वायकर यांच्या पाठपुराव्याने होणार चौकशी

मुंबई, प्रतिनिधी

मुंबई उत्तर-पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रवींद्र वायकर यांच्या सततच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. अंधेरी (पूर्व) येथील कामगार रुग्णालय (ईएसआयसी हॉस्पिटल) च्या पुनर्निर्माण कामातील प्रदीर्घ विलंब, अनियमितता आणि कथित घोटाळ्याची सविस्तर चौकशी करण्याचे आदेश केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दिले आहेत. या रुग्णालयाचे काम १५ वर्षांपासून रखडले असून, २५४ कोटी रुपयांहून अधिक खर्च झाला तरी ते पूर्ण क्षमतेने सुरू झालेले नाही. खासदार वायकर यांच्या प्रयत्नांमुळे आता दोषींवर कारवाई होणार असून, कामगारांना लवकरच उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध होण्याची आशा निर्माण झाली आहे.

९ एप्रिल २०२६ रोजी खासदार रवींद्र वायकर यांनी अंधेरी कामगार रुग्णालयाला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील भीषण वास्तव पाहिले. १९८५ मध्ये सुरू झालेले हे रुग्णालय २००८ मध्ये केंद्र सरकारच्या अखत्यारीत आले. त्यानंतर नूतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले, परंतु ८ वेळा टेंडर प्रक्रिया बदलण्यात आली. नियमानुसार केवळ दोन मजल्यांची परवानगी असताना आठ मजले बांधण्यात आल्याने ताबा प्रमाणपत्र (ओसी) मिळू शकले नाही. परिणामी, इनपेशंट विभाग, ऑपरेशन थिएटर आणि इतर प्रमुख सुविधा अद्याप अपूर्ण अवस्थेत आहेत. एमबीबीएस विद्यार्थ्यांना कांदिवली येथे प्रॅक्टिकल ट्रेनिंगसाठी पाठवावे लागत आहे. २०१८ मधील भीषण आगीच्या दुर्घटनेत ८ जणांचा मृत्यू झाला तरी सुरक्षेच्या बाबतीत पुरेशी दक्षता घेतली गेली नाही, असे खासदार वायकर यांच्या निदर्शनास आले.

या सर्व अनियमिततेबाबत खासदार वायकर यांनी तातडीने केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांची दिल्लीत भेट घेतली आणि सविस्तर निवेदन सादर केले. त्यात १५ वर्षांपासूनचे विलंब, खर्चवाढ, तांत्रिक त्रुटी आणि कामगारांच्या आरोग्याशी होणारा अन्याय याकडे लक्ष वेधले. मंत्री महोदयांनी या मुद्द्याकडे गांभीर्याने पाहिले आणि तातडीने सविस्तर चौकशी करण्याचे निर्देश दिले. चौकशीत दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे आश्वासनही दिले. रुग्णालय लवकरात लवकर पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे मंत्री म्हणाले.

खासदार रवींद्र वायकर यांनी याबाबत सांगितले, "कामगार हे राष्ट्रनिर्माणाचे कणा आहेत. त्यांच्या आरोग्याशी खेळणे सहन केले जाणार नाही. मी दिलेला शब्द पाळला आहे. रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू होईपर्यंत माझा पाठपुरावा सुरूच राहील." या पाठपुराव्यामुळे स्थानिक कामगार, रुग्णालय कर्मचारी आणि रहिवाशांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे. अंधेरीतील हजारो कामगार कुटुंबांना या रुग्णालयाची निकड होती. ओपीडी सेवा काही प्रमाणात सुरू असली तरी इनपेशंट, शस्त्रक्रिया आणि इतर अत्यावश्यक विभाग तातडीने सुरू व्हावेत, अशी मागणी जोर धरत आहे. या प्रकरणात खासदार वायकर यांच्या सक्रिय भूमिकेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. ते नेहमीच आपल्या मतदारसंघातील समस्या सोडवण्यासाठी दिल्लीपासून मुंबईपर्यंत धावपळ करतात. कामगार रुग्णालयाच्या मुद्द्यावर त्यांचा हा सातत्यपूर्ण प्रयत्न हा लोकप्रतिनिधी म्हणून आदर्श उदाहरण आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर दोषींवर कारवाई होऊन रुग्णालयाचे काम वेगाने पूर्ण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

कामगारांच्या हितासाठी खासदार रवींद्र वायकर यांच्यासारख्या नेत्यांचे असे पाठपुरावा समाजात विश्वास निर्माण करतो. मुंबईसारख्या महानगरात कामगार वर्गाला दर्जेदार आरोग्य सुविधा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. या यशस्वी पाठपुराव्याबद्दल खासदार वायकर यांचे अभिनंदन करताना, स्थानिक नागरिक आणि कामगार संघटनांनी त्यांना पाठिंबा जाहीर केला आहे. रुग्णालय लवकर सुरू झाल्यास अंधेरी परिसरातील आरोग्य व्यवस्थेला मोठा बळकटी मिळेल.

मराठी अक्रॉस मुंबई

जोगेश्वरीतील ट्रॉमा केअर रुग्णालयाजवळ 'मिनी फायर स्टेशन' उभारण्याची खा. रवींद्र वायकर यांची मागणी

मुंबई, प्रतिनिधी

जोगेश्वरी परिसरातील रहिवाशांना अग्निशमन सेवेची तातडीने मदत उपलब्ध व्हावी, यासाठी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालयाजवळ महापालिकेच्या जागेवर मिनी फायर स्टेशन उभारण्याची मागणी मुंबई उत्तर-पश्चिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार रवींद्र वायकर यांनी केली आहे.

खासदार वायकर यांनी सांगितले की, जोगेश्वरी परिसर हा घनदाट लोकवस्तीचा आहे. येथे औद्योगिक इमारती, व्यावसायिक कॉम्प्लेक्स आणि मोठ्या संख्येने रहिवासी आहेत. अशा परिस्थितीत आगीच्या घटनेची शक्यता लक्षात घेता, ट्रामा केअर रुग्णालयाजवळ मिनी फायर स्टेशन उभारल्यास परिसरातील नागरिकांना तातडीने मदत मिळू शकेल. सध्या जवळच्या मुख्य फायर स्टेशनवर अवलंबून राहावे लागते, ज्यामुळे वेळेवर प्रतिसाद मिळण्यात अडचण येते.

महापालिकेच्या जागेवर हे मिनी फायर स्टेशन उभारण्याची मागणी करताना खासदार वायकर यांनी पालिका प्रशासनाला याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे आवाहन केले आहे. परिसरातील रहिवासी आणि स्थानिक संघटनांनीही या मागणीला पाठिंबा दिला आहे.

जोगेश्वरी परिसरात यापूर्वीही आगीच्या घटना घडल्या आहेत. अशा घटनांमध्ये तातडीने मदत पोहोचवणे महत्त्वाचे असते. खासदार वायकर यांच्या या मागणीमुळे परिसरातील अग्निसुरक्षा व्यवस्था मजबूत होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

अमली पदार्थांच्या भीतीमुळे बीकेसीतील कॉन्सर्ट रद्द

मुंबई, प्रतिनिधी

रविवारी होणाऱ्या 'सर्कोलोको' या संगीत कार्यक्रमाला बीकेसी पोलिसांनी परवानगी नाकारल्याने आयोजकांना कार्यक्रम सुरू होण्याच्या काही तास आधीच तो रद्द करावा लागला. त्यामुळे चाहत्यांनी समाजमाध्यम 'एक्स'वर नाराजी व्यक्त केली. भारतातील भूमिगत इलेक्ट्रॉनिक संगीत क्षेत्रासाठी हा धक्का असल्याची प्रतिक्रिया अनेकांनी दिली. विशेषतः युरोपमध्येही क्वचितच सादरीकरण करणारे ख्यातनाम डीजे मार्को कारोला मुंबईत येणार होते.

जागतिक कीर्तीच्या इबिझा-आधारित इलेक्ट्रॉनिक संगीत ब्रँड 'सर्कोलोको'च्या भारत आवृत्तीचा हा कार्यक्रम दुपारी २ ते रात्री १० या वेळेत होणार होता. ऑनलाईन ४ हजारांहून अधिक तिकिटांची विक्री झाली होती.

मोठ्या संख्येने तरुणांची बीकेसी परिसरात होणारी गर्दी नियंत्रणात ठेवण्याबाबत कायदा व सुव्यवस्थेच्या कारणास्तव परवानगी नाकारण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

बीकेसी पोलिस ठाण्यातील एका अधिकाऱ्याने सांगितले, "परवानगी नाकारण्यामागे गर्दी व्यवस्थापनाची चिंता, गोरेगाव येथील अलीकडील मैफलीतील मृत्यूची घटना आणि अशा कार्यक्रमांत अमली पदार्थांचा पुरवठा होण्याची शक्यता ही प्रमुख कारणे होती."

"गोरेगाव घटनेनंतर पुरेशी तपासणी होत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. तरुणांची मोठी गर्दी पाहून अमली पदार्थ विक्रेते अशा कार्यक्रमांना लक्ष्य करतात. पूर्वी पोलिस बंदोबस्त मुख्यतः चोरी रोखण्यापुरता मर्यादित होता. मात्र, आता अतिरिक्त पोलिस आयुक्त (पश्चिम विभाग) यांनी विशेष पथके स्थापन करण्याचे नवे परिपत्रक जारी केले आहे," असेही त्यांनी सांगितले.

अधिकाऱ्यांच्या मते, आयोजक गेल्या सहा महिन्यांपासून कार्यक्रमाची तयारी करत होते. मात्र, पोलिस परवानगीसाठी त्यांनी १० एप्रिल रोजीच अर्ज केला.

"आम्ही आयोजक 'सर्कोलोको इंडिया'ला मंजुरीशिवाय कार्यक्रम पुढे नेऊ नये, अशा तीन नोटिसा बजावल्या होत्या. १९ एप्रिल रोजी ६ हजार लोकांच्या जमावासाठी त्यांनी परवानगी मागितली होती; मात्र अर्ज फेटाळण्यात आला," असे अधिकाऱ्याने सांगितले.

शनिवारी होणाऱ्या गायक-अभिनेता परेश पाहुजा यांच्या संगीत कार्यक्रमालाही जुहू पोलिसांनी परवानगी नाकारल्याची माहिती दुसऱ्या अधिकाऱ्याने दिली. गोरेगाव घटनेनंतर पोलिस आणि महापालिकेने नव्या नियमांची अंमलबजावणी सुरू केल्याने ही कठोर भूमिका घेतल्याचे त्यांनी सांगितले.

ऑनलाईन निवेदनात आयोजकांनी म्हटले, "आवश्यक परवानग्या मिळालेल्या नाहीत. आम्ही सर्व सरकारी नियम व निर्णयांचा पूर्ण आदर करतो आणि त्यांचे पालन करणे बंधनकारक आहे."

एका नाराज चाहत्याने 'एक्स'वर प्रतिक्रिया देताना म्हटले, "अमली पदार्थांशी संबंधित अलीकडील मृत्यूंमुळे हा निर्णय झाला, हे समजते. पण त्यासाठी संपूर्ण शहराने शिक्षा भोगावी, असे नाही."

एसएनडीटीत स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन

मुंबई, प्रतिनिधी

एसएनडीटी महिला विद्यापीठाने ठाणे महापालिका संचालित सी. डी. देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेसोबत सामंजस्य करार केला असून, या माध्यमातून विद्यार्थिनींना विविध स्पर्धा परीक्षांसाठी दर्जेदार मार्गदर्शन व प्रशिक्षण उपलब्ध होणार आहे.

या करारामुळे विद्यार्थिनींना यूपीएससी), एमपीएससी, एसएससी, आयबीपीएस, सीजीएल), आयबी तसेच जेएमएफसी यांसारख्या परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण मिळणार आहे. त्यामुळे प्रशासकीय सेवेकडे विद्यार्थिनींचा कल वाढण्यास मदत होणार आहे.

विद्यापीठाच्या कमिटी रूममध्ये आयोजित समारंभात या करारावर संस्थेचे संचालक महादेव जगताप आणि विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नंदावडेकर यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. उज्वला चक्रदेव होत्या.

या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षांची तयारी अधिक प्रभावीपणे करता येईल आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही चालना मिळेल. प्रशासकीय सेवेत महिलांचे प्रमाण वाढविण्यासाठी हा करार महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास यावेळी कुलगुरू प्रा. उज्वला चक्रदेव यांनी व्यक्त केला. संस्थेचे संचालक महादेव जगताप यांनी सांगितले की, इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे प्रशासकीय सेवेत प्रमाण कमी असल्याने ते वाढविण्याच्या उद्देशाने ठाणे महापालिकेने सन १९८७ पासून ही संस्था सुरू केली आहे. संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन, निवास व्यवस्था तसेच दरमहा सुमारे ३ हजार रुपयांचे विद्यावेतन दिले जाते. या माध्यमातून अनेक विद्यार्थी प्रशासकीय सेवेत रुजू झाले आहेत. या कार्यक्रमाला ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी स्पर्धा परीक्षेच्या तयारीविषयी मार्गदर्शन केले.

डॉमिनोज पिझ्झा सेंटरमध्ये अवैध एलपीजी गॅस वापर उघड

मुंबई, प्रतिनिधी

शहरातील एलपीजी गॅसच्या काळ्याबाजारावर आळा घालण्यासाठी नागरी पुरवठा विभागाने १८ एप्रिल रोजी राबविलेल्या विशेष धाड मोहिमेत डॉमिनोज पिझ्झा सेंटरमध्ये अवैधरित्या एलपीजी गॅसचा वापर होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या कारवाईत चेंबुर आणि अनुशक्तीनगर (देवनार) परिसरात दोन गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई चंद्रकांत डांगे यांच्या निर्देशानुसार, उपनियंत्रक शिधावाटप 'ई' परिमंडळ श्रीमती रिना बसैय्ये यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक नियंत्रक शिधावाटप रामकृष्ण कांबळे यांच्या अधिपत्याखालील पथकाने ही कारवाई केली. एलपीजी गॅसचा काळाबाजार व अनियमितता रोखण्यासाठी ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली होती.

स्पेन, जपान व नेदरलँड्सच्या कंपन्यांची गारगाई धरण सल्लागार कामात रुची

मुंबई, प्रतिनिधी

गारगाई धरणाच्या बांधकामासाठी स्वीकृतीपत्र (एलओए) जारी केल्यानंतर मुंबई महापालिकेने प्रकल्पातील महत्त्वाच्या बाबींवर देखरेख करण्यासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सुरू केली आहे. बाधित गावकऱ्यांचे पुनर्वसन, वृक्ष स्थलांतर आणि सुरक्षितता तसेच आराखड्यासंदर्भातील तांत्रिक मार्गदर्शन यांचा यात समावेश आहे.

अलीकडे झालेल्या पूर्व-निविदा बैठकीत स्पेन, जपान आणि नेदरलँड्समधील कंपन्यांनी या कामात रस दर्शविला. अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सल्लागार घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. या कामाची अंदाजित किंमत २५ कोटी रुपये आहे.

महापालिकेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले, "जपानमधील निप्पॉन कोईसह काही भारतीय कंपन्यांनीही रस दाखविला आहे. मात्र, प्रकल्पाच्या अंतिम आराखड्यावर सल्लागाराचा अंतिम निर्णय राहणार नाही. अंतिम आराखड्याची तपासणी महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीतील नाशिक येथील केंद्रीय रचना संघटना करणार आहे."

पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील ओगाडा गावात हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत सुमारे ३ लाख झाडांचे स्थलांतर करण्यात येणार असून, वाशीम, चंद्रपूर आणि हिंगोली जिल्ह्यांतील ६५८ हेक्टर क्षेत्रात भरपाई स्वरूपात वृक्षलागवड केली जाणार आहे. तसेच बाधित गावकऱ्यांचे वाडा तालुक्यातील देवळी येथे पुनर्वसन प्रस्तावित आहे.

या आठवड्याच्या अखेरीस कार्यादेश जारी होण्याची शक्यता असून, प्रकल्प पूर्णत्वासाठी चार वर्षांची मुदत निश्चित करण्यात आली आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले, "साधारणपणे स्वीकृतीपत्र दिल्यानंतर बँक हमी, कामगार परवाने आणि अधिकारपत्र यांसारख्या अनिवार्य पूर्ततेसाठी ३० दिवसांची मुदत दिली जाते. मात्र, येत्या आठवड्यात ही प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यादेश जारी होईल, अशी अपेक्षा आहे."

कार्यादेशानंतर पहिल्या वर्षात आवश्यक परवानग्या मिळविणे आणि बाधित सहा गावांच्या पुनर्वसनासाठी पायाभूत सुविधा उभारणे हे काम होणार आहे. दुसऱ्या वर्षी धरण बांधकामास सुरुवात होईल, तर तिसऱ्या वर्षी विद्युत यंत्रणा बसविण्यात येईल.

वन व वन्यजीव विभागाच्या परवानग्या मिळविण्यासाठीही समांतर प्रयत्न सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, आवश्यक परवानग्या मिळण्यापूर्वीच प्रकल्पास मंजुरी देण्यात आल्याबद्दल विरोधकांनी प्रशासनावर टीका केली आहे. महापालिकेतील काँग्रेस गटनेते अशरफ आझमी म्हणाले, "महापालिकेने सर्व परवानग्या मिळवल्यानंतरच धरणाच्या कामास सुरुवात करायला हवी होती."

गारगाई धरण कार्यान्वित झाल्यानंतर मुंबईच्या पाणीपुरवठ्यात दररोज ४४० दशलक्ष लिटरची भर पडणार आहे. २०१४ मध्ये मिडल वैतरणा प्रकल्प सुरू झाल्यानंतर मुंबईसाठी उभारले जाणारे हे पहिले नवे जलाशय ठरणार आहे.

विकसित भारतासाठी सर्वांना सोबत घेणे आवश्यक : गहलोत

मुंबई, प्रतिनिधी

ज्ञान समाजाच्या कल्याणासाठी उपयोगी पडले पाहिजे आणि विकसित भारताच्या निर्मितीसाठी सर्वसमावेशक दृष्टीकोन आवश्यक असून प्रत्येक घटकाला सोबत घेऊन पुढे जाण्याची गरज असल्याचे प्रतिप्रादन कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत यांनी केले.

टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस (टीआयएसएस) चा ८५ वा वार्षिक दीक्षांत समारंभ मुंबई कॅम्पसमध्ये उत्साहात पार पडला. यावेळी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. या सोहळ्यात एकूण १ हजार ८० विद्यार्थ्यांना विविध पदव्या प्रदान करण्यात आल्या. यावेळी व्यासपीठावर टीआयएसएसचे कुलगुरू प्रा. डी. पी. सिंग आणि प्रा. बद्री नारायण तिवारी उपस्थित होते.

दीक्षांत समारंभात एकूण ९७ संशोधकांना पीएचडी एका विद्यार्थ्याला एम. फिल. पदवी प्रदान करण्यात आली. याशिवाय ९८२ विद्यार्थ्यांना मास्टर्स, बी.एड., बी.एड. एम.एड. तसेच द्वैती पदव्या प्रदान करण्यात आल्या. विविध शाखांमधील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरवही करण्यात आला.

राज्यपाल गहलोत म्हणाले की, शिस्त, सातत्य आणि कठोर परिश्रम या यशाच्या गुरुकिल्ली आहे. ज्ञान केवळ वैयक्तिक प्रगतीपुरते मर्यादित न ठेवता ते समाजाच्या उन्नतीसाठी वापरण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कुलपती प्रा. डी. पी. सिंग यांनी यावेळी विद्यार्थ्यांकडून समाज-सेवेची शपथ घेतली. समाजाशी बांधिलकी जपत शिक्षणाचा उपयोग जनकल्याणासाठी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कुलगुरु प्रा. बद्री नारायण तिवारी यांनी २०२४-२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सादर करत संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. नवीन शिक्षण धोरण (एनईपी) लक्षात घेऊन अध्यापन, संशोधन आणि क्षेत्रीय उपक्रमांमध्ये सातत्याने नवनवीन प्रयोग करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. तसेच संस्थेने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली शैक्षणिक ओळख अधिक बळकट करण्यासाठी विविध उपक्रम राबविल्याची माहिती त्यांनी दिली.

महानगरपालिकेत नोकरीचे आमिष दाखवून अनेकांना गंडा

मुंबई, प्रतिनिधी

महानगरपालिकेत विविध केली होती. यावेळी अमिताने प्रत्येक पदावर नोकरीच्या नावाने अनेकांना गंडा घालण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी बोगस दस्तावेज सादर करुन फसवणुक केल्याप्रकरणी अमिता जगदीश राठोड या महिलेविरुद्ध भोईवाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

अमिताने आतापर्यंत सोळ-ाजणांची सुमारे दहा लाखांची फसवणुक केल्याचे प्राथमिक तपासात उघडकीस आले असून फसवणुकीचा हा आकडा आणखीन वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. यातील तक्रारदार महिला चेंबूर येथे राहते. तीन वर्षांपूर्वी ती मनपाच्या एफ/साऊथ विभागात गेली होती. तिथेच तिची अमिताशी ओळख झाली होती. ती तिथे ५० तरुणींना घेऊन मेडीकलसाठी आली होती. चौकशीदरम्यान अमिताने ती कस्तुरबा रुग्णालयात नर्स म्हणून काम करते. तिची मनपाच्या काही वरिष्ठ अधिकाऱ्यांशी ओळख असल्याचे सांगून अनेकांना मनपामध्ये नोकरी मिळवून दिली आहे. त्यामुळे तक्रारदार महिलेने तिच्या मुलासह तिच्या परिचित काही बेरोजगार तरुणांना देण्याची विनंती

उमेदवारामागे सत्तर हजार रुपये खर्च अपेक्षित असल्याचे सांगितले. तिला चौदाजांकडून प्रत्येकी सत्तर तर इतर दोघांकडून प्रत्येकी दहा हजार असे दहा लाख रुपये मिळाले. ९ जानेवारी ते २७ जून २०२४ या कालावधीत तिने अमिताला पाच लाख वीस हजार ऑनलाईन तर चार लाख ऐंशी हजार कॅश स्वरुपात दिले. मात्र दिलेल्या मुदतीत तिने कोणालाही नोकरी दिली नाही. विचारणा केल्यानंतर तिने तिघांना मनपामध्ये नोकरी लागल्याचे बोगस नियुक्तीपत्र दिले. त्यामुळे त्यांनी तिच्याकडे नोकरीसाठी दिलेल्या पैशांची मागणी सुरु करताच अमिताने त्यांना दहा लाखांचे दोन धनादेश दिले, मात्र ते दोन्ही धनादेश बँकेत न वटता परत आले. तोपर्यंत अमिता राठोड ही पळून गेली.

शेवटी हा प्रकार लक्षात येताच तक्रारदारा भोईवाडा पोलीस ठाण्यात धाव घेत अमिताविरुद्ध तक्रार केली. या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर तिच्याविरुद्ध सोळा उमेदवारांची सुमारे दहा लाखांची फसवणुक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. तिने असे किती जणांना गंडवले याचाही शोध आता घेतला जात आहे.

हॉटेलवर छापा; पिस्तूल, मॅगझीन्ससह पाच अटकेत

मुंबई, प्रतिनिधी

पायधुनीतील एका हॉटेलमध्ये गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने कारवाई करुन पाच आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात घातक शस्त्रे जप्त केली आहेत. सुरेंद्र अमरलालजी मिना, रोहित धनश्याम मिना, कार्तिक विरेंद्र पारचा, दिपककुमार छितरलाल बिल आणि रोनूरौनक पन्नालाल मैराठा अशी या पाचजणांची नावे आहेत.

या कारवाईत पोलिसांनी तीन देशी बनावटीचे पिस्तूल, तीन मॅगझीन, पाच मोबाईल आणि एकवीस जिवंत काडतुसांचा साठा जप्त केला आहे. पाचही आरोपींना किल्ला न्यायालयाने २२ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पायधुनीतील नारायण ध्रुव मार्गावर ॲलिगंट नावाचे एक हॉटेल आहे.

या हॉटेलमध्ये इतर राज्यातून आलेल्या काही तरुण राहत असून त्यांच्याकडे घातक शस्त्रे असल्याची माहिती खंडणीविरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीनंतर या पथकाने हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावरील रुम क्रमांक ३०५ मध्ये छापा टाकला होता. यावेळी पोलिसांनी रुममधून तीन देशी बनावटीचे पिस्तूल, तीन मॅगझीन आणि एकवीस जिवंत काडतुसे जप्त केली.

याच गुन्ह्यांत नंतर सुरेंद्र मिना, रोहित मीना, कार्तिक पारचा, दिपककुमार बिल आणि रौनूरौनक मैराठा या पाचजणांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. तपासात ते सर्वजण राजस्थान आणि हरियाणाचे रहिवाशी असल्याचे उघडकीस आल होते. काही दिवसांपूर्वीच ते राजस्थानातून मुंबईत घातक शस्त्रांची विक्रीसाठी आले होते. मात्र शस्त्रांची विक्री करण्यापूर्वीच त्यांना पोलिसांनी अटक केली. यातील काही आरोपींविरुद्ध अनेक गंभीर गुन्हे दाखल असून ते रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे बोलले जाते. या पाचजणांविरुद्ध घातक शस्त्रे बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून याच गुन्ह्यांत नंतर त्यांना पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर त्यांना रविवारी दुपारी किल्ला न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या पाचही आरोपींची पोलिसांकडून चौकशी सुरु आहे.

विद्यार्थी असल्याचे भासवून विमान तळाबाहेर प्रवाशांची फसवणूक

मुंबई, प्रतिनिधी

नागपूरमधील अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी असल्याचे भासवून विमानप्रवासासाठी पैसे मागणारा एक तरुण फसवणूक करत असल्याचा इशारा शहर पोलिसांनी हवाई प्रवाशांना दिला आहे. हा तरुण स्वतःचे तिकीट हरवले असून तातडीने महाविद्यालयात परतायचे आहे किंवा दुसऱ्या शहरात जायचे आहे, असे सांगून प्रवाशांकडे पैसे मागतो. अशा प्रकारच्या विनंत्यांवर विश्वास ठेवू नये आणि तत्काळ जवळच्या पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, विमानतळाबाहेर अशाच पद्धतीने किमान तीन ते चार जणांची फसवणूक झाली आहे.

या प्रकरणातील ताजी तक्रार पुण्यातील ३१ वर्षीय विक्री व्यवस्थापक अक्षय गवाडे यांनी केली आहे. २१ मार्च रोजी मुंबई देशांतर्गत विमानतळाच्या आगमन प्रवेशद्वाराबाहेर पडल्यानंतर त्यांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. त्यांनी २९ मार्च रोजी ई-मेलद्वारे तक्रार केल्यानंतर शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी सांगितले की, संशयिताने स्वतःची ओळख निलाबोयना श्रीगिरीधरा आदित्य अशी करून दिली होती. त्याचा शोध घेण्यासाठी विमानतळ परिसरातील सीसीटीव्ही चित्रफितींची तपासणी सुरू आहे.

पुण्यातील एका कंपनीत कार्यरत असलेले गवाडे अधिकृत दौऱ्यावरून कोलकाता येथून मुंबईत आले होते. तक्रारीत त्यांनी म्हटले आहे, "दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास मी मुंबई देशांतर्गत विमानतळाच्या आगमनद्वाराबाहेर आलो. तेव्हा एक तरुण माझ्याजवळ आला. त्याने स्वतःची ओळख निलाबोयना श्रीगिरीधरा अशी करून दिली. तो खूप चिंताग्रस्त दिसत होता. स्वतःला नागपूर येथील व्हीएनआयटी महाविद्यालयाचा विद्यार्थी असल्याचे सांगून त्याने ओळखपत्रही दाखवले. हैदराबादला जाण्याचे तिकीट हरवले असून तातडीने पैशांची गरज असल्याचे त्याने सांगितले. मी त्या ओळखपत्राचा छायाचित्रही मोबाईलमध्ये जतन केला."

त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून गवाडे यांनी त्या तरुणाच्या मोबाईलवरील क्यूआर संकेतचिन्ह स्कॅन करून 'गुगल पे'द्वारे १६ हजार रुपये पाठवले. त्या व्यक्तीने मोबाईल क्रमांक देत लवकरच पैसे परत करण्याचे आश्वासनही दिले.

मात्र, दोन दिवसांनी 'व्हॉट्सॲप'वर संपर्क साधल्यानंतर संशयिताने परतफेड टाळली आणि अखेरीस गवाडे यांना अवरोधित केले.

यानंतर गवाडे यांनी नागपूर येथील व्हीएनआयटी संस्थेशी संपर्क साधला. संस्थेने त्या नावाचा कोणताही विद्यार्थी प्रवेशित नसल्याचे सांगितले. तसेच यापूर्वीही किमान तीन जणांनी अशाच चौकशा केल्याचे स्पष्ट केले.

पोलिसांनी सांगितले की, पैसे जमा झालेल्या खात्याची बँक माहिती मागविण्यात आली असून आरोपीची ओळख पटवून त्याचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

सिद्धिविनायक मंदिरात लिलावातून ९६ लाख रुपये जमा

मुंबई, प्रतिनिधी

प्रभादेवी येथील सिद्धीविनायक मंदिरात अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर आयोजित करण्यात आलेल्या दागिन्यांच्या लिलावाला भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या लिलावातून एकूण ९६ लाख १७ हजार ५११ रुपये इतकी रक्कम न्यासाकडे जमा झाली आहे.

मंदिर न्यासाच्या वतीने श्रींच्या चरणी भक्तांनी अर्पण केलेल्या सोन्याच्या अलंकारांचा हा जाहीर लिलाव रविवारी पार पडला. लिलावात एकूण १७१ सोन्याचे अलंकार (वजन ६८४ ग्रॅम ८२० मिलीग्रॅम) ठेवण्यात आले होते. त्यापैकी १५६ अलंकार (वजन ५७७ ग्रॅम ६८० मिलीग्रॅम) विक्रीस गेले. या विक्रीतून ९० लाख ४७ हजार २११ रुपये प्राप्त झाले, तर चांदीच्या नाण्यांच्या विक्रीतून ५ लाख ७० हजार ३०० रुपये जमा झाले, अशाप्रकारे एकूण रक्कम ९६ लाख १७ हजार ५११ रुपये इतकी झाल्याची माहिती न्यासाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वीणा पाटील यांनी दिली.

सिद्धीविनायक मंदिर हे मुंबईकरांचे श्रद्धास्थान असून, येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. बाप्पाला अर्पण केलेले दागिने आशीर्वादाच्या स्वरूपात मिळावेत, या भावनेतून भक्त मोठ्या उत्साहाने या लिलावात सहभागी होतात. ही परंपरा मंदिर न्यासाने अनेक वर्षांपासून जपली आहे. रविवारी लिलावासाठी आलेल्या भाविकांमध्ये मुंबईसह राज्यभरातून भक्त सहभागी झाले होते. अनेकांनी बाप्पाच्या चरणी अर्पण केलेले अलंकार प्रसाद स्वरूपात मिळावेत, या श्रद्धेने स्पर्धात्मक बोली लावत सहभाग नोंदवला.

महत्त्वाच्या बातम्या

५ कोटी रुपयांच्या एमडीएमएसह महिलेला अटक

मुंबई, प्रतिनिधी

मुंबई अंमली पदार्थ नियंत्रण विभागाने (एनसीबी) कल्याण तालुका पोलिसांच्या मदतीने टिटवाळा येथील ३५ वर्षीय महिलेला अटक करून तिच्याकडून सुमारे ५ कोटी रुपयांच्या एमडीएमए गोळ्या, म्हणजेच 'एक्स्टसी', जप्त केल्या असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी महिलेच्या ताब्यातून २.३ किलोहून अधिक एमडीएमए सापडले. रात्री एनसीबीच्या पथकाने टिटवाळ्यातील एका सदनिकेवर छापा टाकला. तेथे ही महिला वास्तव्यास होती. या कारवाईत अंमली पदार्थविरोधी पथकाने ५ हजार गोळ्यांचा साठा जप्त केला. १५ एप्रिल रोजी अटक करण्यात आलेल्या एका आरोपीच्या चौकशीनंतर ही कारवाई करण्यात आली. चौकशीदरम्यान संबंधित महिला अंमली पदार्थांच्या पुरवठ्यात सहभागी असल्याची माहिती अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्या आधारे एनसीबीने कल्याण तालुका पोलिसांच्या समन्वयाने तिचा ठावठिकाणा शोधून काढला. एनसीबीने महिलेला ताब्यात घेतले असून, या प्रकरणामागील मोठे अमली पदार्थ जाळे आणि पुरवठा साखळी उघड करण्यासाठी पुढील तपास सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

म्हाडाच्या महागड्या घरांना अल्प प्रतिसाद

मुंबई, प्रतिनिधी

मुंबई मंडळाच्या सुरू असलेल्या सोडतीतील अनेक महागड्या घरांकडे ग्राहकांनी पाठ फिरवल्याने म्हाडा घरांच्या किमती कमी करण्याच्या विचारात आहे. उच्च उत्पन्न गटातील (एचआयजी) अनेक सदनिका आणि 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' यातील घरे पडून आहेत. त्या पार्श्वभूमीवर, किमती कमी करण्याचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. म्हाडा मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' योजनेंतर्गत असलेल्या ११७ पैकी ५४ सदनिका अजूनही विक्रीविना पडून आहेत. म्हाडाच्या नियमांनुसार आणि उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली अशा विक्रीविना राहिलेल्या सदनिकांच्या किमती कमी करण्याची प्रक्रिया राबवली जाऊ शकते.

काही शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी पगाराच्या प्रतीक्षेत

मुंबई, प्रतिनिधी

: शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पगाराचा गोंधळ अद्यापही सुरूच आहे. अतिरिक्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी असणाऱ्या शाळा, डिजिटलायझेशन पूर्ण न झालेल्या शाळा, शून्य शिक्षकी शाळा यांना पगारबिलातून वगळण्यात आल्याचा आणि पगार विलंबाचा निषेध व्यक्त करण्यासाठी शिक्षक भारती व शिक्षकेतर कर्मचारी संघटनांनी संयुक्तपणे शिक्षण उपसंचालकांना जाब विचारला, अशी माहिती शिक्षक भारती संघटनेचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी दिली. मुंबईसह राज्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाला सलग दोन महिने विलंब होत आहे. त्यामुळे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे. शालार्थ प्रणालीमधील तांत्रिक अडचणींचे कारण देऊन शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन काही महिन्यांपासून उशिराने होत आहे. फेब्रुवारी २०२६ चे वेतन १३ मार्च नंतर झाले.

महापौरांचा अनाथ मुला-मुलींशी संवाद

मुंबई, प्रतिनिधी

मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त माणुसकीचा स्नेहस्पर्श जपत 'दी चिल्ड्रेन्स एड सोसायटी' संचलित बालकल्याण नगरी (मानखुर्द) आणि चेंबूर चिल्ड्रन्स होम येथे अनाथ मुला-मुलींसमवेत वेळ घालवत त्यांना स्नेहभोजन दिले तसेच शालेय बॅगचे वितरण केले. महापौर रितू तावडे यांनी विद्यार्थी, विद्यार्थिनींशी अत्यंत आपुलकीने संवाद साधत त्यांच्या आयुष्यात शिक्षणाचे स्थान किती महत्त्वाचे आहे, यावर भर दिला. "परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षणाच्या बळावर आपण स्वप्ने साकार करू शकतो. या सुधार गृह आणि अनाथ आश्रम यातील प्रत्येक मुलगा, मुलगी सक्षम, स्वावलंबी आणि जबाबदार नागरिक म्हणून घडावी, हीच अपेक्षा आहे. शासन आणि महानगरपालिका त्यांच्या पाठीशी कायम उभे आहे, असे सांगून महापौरांनी सर्व मुला-मुलींशी संवाद साधला. या कार्यक्रमास 'दी चिल्ड्रेन्स एड सोसायटी'चे उपमुख्य अधिकारी सतीश बनसोडे, बालकल्याण नगरीच्या प्रशासका रेणुका जाधव, चेंबूर चिल्ड्रन होमचे अधीक्षक तुषार भिलावेकर, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मानखुर्द) चे प्राचार्य स्वप्निल घाटे तसेच संस्थेतील कर्मचारी वर्ग उपस्थित होते. हा उपक्रम अत्यंत आनंददायी वातावरणात पार पडला.

मूत्रपिंड प्रत्यारोपण यशस्वी सासऱ्याचे जावयाला जीवदान

मुंबई, प्रतिनिधी

वैद्यकीय क्षेत्रातील अत्यंत दुर्मिळ आणि गुंतागुंतीचे मानले जाणारे 'एबीओ विसंगत' मूत्रपिंड प्रत्यारोपण यशस्वीपणे पार पडले. यामुळे ३९ वर्षीय रुग्णाला नवे जीवन मिळाले आहे. एका खासगी रुग्णालयात हे प्रत्यारोपण झाले. हा रुग्ण मधुमेहाने ग्रस्त असून, शारीरिकदृष्ट्या कमकुवत होता. कुटुंबात योग्य दाता उपलब्ध नसल्याने मोठी अडचण निर्माण झाली होती. अशा वेळी रुग्णाच

डेटा सेंटर कंपन्यांना त्वरित जागा द्या! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

मध्य आशियातील डेटा सेंटर क्षेत्रातील अनेक नामांकित कंपन्या महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी उत्सुक आहेत. त्यामुळे करार झाल्यानंतर संबंधित कंपन्यांना त्वरित जागा आणि वीज उपलब्ध करून द्या, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी येथे दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे डेटा सेंटर्स संदर्भात बैठक झाली. या बैठकीत सादरीकरण करण्यात आले. त्यावेळी बोलताना फडणवीस यांनी डेटा सेंटर क्षेत्रातील अनेक नामांकित कंपन्या महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी इच्छुक असल्याची माहिती दिली.

या कंपन्यांच्या प्रकल्प उभारणीसाठी संदर्भातील सर्व अत्यावश्यक कामे तसेच प्रामुख्याने जमीन उपलब्ध करून देण्याची कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात यावीत. याशिवाय संबंधित कंपन्यांना वीजेची उपलब्धताही प्राधान्याने करुन द्यावी.

संबंधित यंत्रणांनी याबाबत दक्षता घ्यावी. सिडकोने यासाठी भू बँक विकसित करावी. ऊर्जा विभागाने सब स्टेशनसाठी जागा त्वरित उपलब्ध करून घ्यावी, अशा सूचना फडणवीस यांनी यावेळी केल्या.

या बैठकीत सिडकोच्या वतीने डेटा सेंटरसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली.

तर डेटा सेंटर क्षेत्रातील कंपन्यांसाठी पुरेश्या विजेची उपलब्धता करून देण्यात येत असल्याची माहिती ऊर्जा विभागामार्फत देण्यात आली.

बैठकीला उद्योग मंत्री डॉ उदय सामंत दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. याशिवाय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, ऊर्जा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव लोकेश चंद्रा, डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बळगन आदी उपस्थित होते.

आवश्यक वीजनिर्मिती व सुरळीत वीज पुरवठ्यासाठी यंत्रणा सज्ज

उन्हाळ्याच्या काळातील 'पीक डिमांड' संदर्भात वीज वितरण आढावा बैठक

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

वीजनिर्मिती व वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी ऊर्जा विभाग व संबंधित यंत्रणांनी 'एआय'चा वापर करून यासंदर्भातील व्यवस्थापन करण्यावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उन्हाळ्याच्या काळातील 'पीक डिमांड' संदर्भात वीज वितरण आढावा बैठक झाली. यावेळी ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ श्रीकर परदेशी, टाटा पॉवर, अदाणी पॉवरचे व 'बेस्ट'चे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उन्हाळा व पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा विभाग व संबंधित यंत्रणांनी वीजनिर्मिती व पुरवठा सुरळीत राहण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना युद्धपातळीवर कराव्यात. यासाठीच्या

व्यवस्थापनासाठी तसेच देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी 'एआय'चा वापर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

रुफटॉप सौर ऊर्जेमुळे फायदा होत आहे. वीज निर्मितीसाठी पुरेसा कोळसा व पाण्याची उपलब्धताही आहे. वीजनिर्मिती व पुरवठा सुरळीत रहावा यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात मॉन्सूनपूर्व देखभाल दुरुस्तीची कामेही करण्यात येत आहेत. आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी यंत्रणा सज्ज असल्याची माहिती यावेळी ऊर्जा विभागामार्फत देण्यात आली.

- कोयना जलविद्युत प्रकल्प: गरजेनुसार १८०० मेगावॅट पर्यंत पूर्ण क्षमतेने वापर
- आपत्कालीन परिस्थितीत: आवश्यकतेनुसार अतिरिक्त वीज खरेदी
- एमएमआरमधील प्रसारण प्रणालीचे मजबूतीकरण

पुरेशा वीज खरेदीची व्यवस्था

- मुंबई आयलँडिंग योजना कार्यरत ही एक महत्त्वाची सुरक्षा यंत्रणा असून, ग्रीडमध्ये बिघाड झाल्यास मुंबईला स्वतंत्रपणे चालवण्याची क्षमता.
- मोठ्या प्रमाणातील वीज खंडित होण्यापासून संरक्षण
- भिरा पंप्ड स्टोरेज प्रकल्प कार्यरत
- सर्व ब्लॅक स्टार्ट ड्रिल्स यशस्वीरीत्या पूर्ण
- राज्य लोड डिस्पॅच केंद्र (SLDC) च्या बॅकअप कंट्रोल ड्रिल पूर्ण ज्यामुळे मुख्य नियंत्रण केंद्रात अडचण आल्यास कामकाज सुरळीत चालू राहू शकते.

पुढील तीन दिवसात वादळी पावसाची शक्यता

शेतकऱ्यांना आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

पश्चिम महाराष्ट्र (प्रामुख्याने घाट परिसर), उत्तर महाराष्ट्र , मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये येत्या २० ते २२ एप्रिल दरम्यान दुपारनंतर काही प्रमाणात आभाळी हवामान आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत विजांचा कडकडाट, पाऊस तसेच काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार आज, रविवारपासून पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर तसेच उत्तर खानदेश आणि दक्षिण मराठवाड्यातील काही भागांमध्ये दुपारनंतर वादळी पावसाची शक्यता आहे. त्यानंतर २० आणि २१ एप्रिल रोजी पावसाच्या क्षेत्रात वाढ होण्याची चिन्हे आहेत. ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाडा (प्रामुख्याने दक्षिण भाग आणि छत्रपती संभाजीनगर विभाग) आणि विदर्भात (प्रामुख्याने अमरावती विभाग) काही प्रमाणात वादळी पाऊस पडेल. मात्र २२ तारखेला वादळी पावसाच्या क्षेत्रात आणि तीव्रतेत घट होईल.

राज्यात वादळी पावसाची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी शेतीची कामे हवामानानुसार नियोजित करावीत. काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवावीत किंवा सुरक्षित ठेवावीत. वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीट यापासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. शेतमाल, भाजीपाला व इतर काढणी केलेले उत्पादन उघड्यावर ठेवू नये, असे आवाहन कृषि विभागाने केले आहे.

'मोदी ही सत्यकथा, तर उबाठा म्हणजे केवळ वळवळणारी जंतकथा' भाजपचा राऊतांवर तुफानी प्रहार

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

"पंतप्रधान नरेंद्र मोदींचे कर्तृत्व ही या देशासाठी एक 'सत्यकथा' आहे, तर संजय राऊत तुमचा पक्ष म्हणजे केवळ पोटातील जंताप्रमाणे वळवळणारी एक 'जंतकथा' उरली आहे," अशा तिखट शब्दांत भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी उबाठा गटावर जोरदार हल्लाबोल केला. 'मोदी है तो मुमकीन है' हे जनतेने तीन वेळा सिद्ध केले असून, राऊतांनी भाजपमधील संघर्षाच्या गप्पा मारण्यापेक्षा स्वतःच्या पक्षातील अंतर्गत यादवीकडे लक्ष द्यावे, असा टोलाही त्यांनी लगावला.

महिला आरक्षण विधेयकावरून उबाठा गटाने घेतलेल्या भूमिकेचा समाचार घेताना बन म्हणाले की, नारी शक्ती वंदन विधेयकाला विरोध करून उबाठा गटाने महिला शक्तीचा अपमान केला आहे. महिला आरक्षण संसदेत पाडण्याचे पाप करणाऱ्यांना महाराष्ट्रातील 'लाडकी बहीण' कधीही माफ करणार नाही. आगामी निवडणुकीत महिला वर्ग रस्त्यावर उतरून तुमचा सुफडा साफ करेल, असा इशारा त्यांनी दिला. तसेच, या विधेयकाच्या निमित्ताने उत्तर विरुद्ध दक्षिण असा वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करून इंडिया आघाडीने देशविरोधी भूमिका घेतल्याचा आरोपही त्यांनी केला.

पक्षांतर्गत वादावरून राऊतांना आरसा दाखवताना बन म्हणाले की, भाजपमध्ये 'देश प्रथम' ही भावना असते, तिथे मोदी विरुद्ध शहा असा संघर्ष शोधणे हास्यास्पद आहे. उलट उबाठा गटातच आदित्य ठाकरे विरुद्ध संजय राऊत किंवा प्रियंका चतुर्वेदी विरुद्ध संजय राऊत असा 'गचांडी' धरण्याचा प्रकार सुरू आहे. स्वतः प्रियंका चतुर्वेदी यांनी महिला आरक्षणाचे समर्थन करून राऊतांना आरसा दाखवला आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला हवे.

अमृता फडणवीस आणि ॲक्सिस बँकेच्या मुद्द्यावरूनही बन यांनी राऊतांना चांगलेच सुनावले. "लैंगिक शोषणाबद्दल बोलणाऱ्या राऊतांनी 'पाटकर फाइल्स'मधील त्या ऑडिओ क्लिपची आठवण ठेवावी, ज्यात त्यांनी एका महिलेला अत्यंत खालच्या भाषेत धमकावले होते," असे ते म्हणाले. ॲक्सिस बँकेतील प्रकरणाची रीतसर चौकशी झालेली असताना, उद्धव ठाकरेंनी टीसीएस प्रकरण आणि राज्यातील धर्मांतराच्या मुद्द्यावर 'मूग गिळून' गप्प का आहेत, असा थेट सवालही नवनाथ बन यांनी यावेळी उपस्थित केला.

ठाणेकरांचा प्रवास आता 'हाय-टेक'; १५ दिवसांत रस्त्यावर अवतरणार दुमजली स्वारी!

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

ठाणे शहराच्या वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी आणि प्रवासाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी आता एक मोठी गूड न्यूज समोर आली आहे. येत्या १५ दिवसांत ठाण्याच्या रस्त्यांवर डबड डेकर बस धावताना दिसणार आहेत. परिवहन विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या ऐतिहासिक प्रवासाची पूर्वतयारी म्हणून पुढील आठवड्यातच डबल डेकर बसची अधिकृत चाचणी घेतली जाणार असून, पहिल्या टप्प्यात एकूण १० बसेस प्रवाशांच्या सेवेसाठी सज्ज होणार आहेत.

नव्या प्रवासासाठी ठाणे परिवहन विभागाने महत्त्वाचे तीन मार्ग निश्चित केले असून, यामुळे शहरातील मुख्य भागांना मोठा दिलासा मिळणार आहे. पहिला मार्ग 'तीन हात नाका' ते थेट घोडबंदरमधील 'गायमुख' असा असेल, तर दुसरा मार्ग 'शिळफाटा दत्त मंदिर' ते 'डोंबिवली एन्ट्री पॉईंट'पर्यंत निश्चित करण्यात आला आहे. तिसरा मार्ग 'पारसिक नगर मुंब्रा वळण रस्ता' ते 'कळवा शिवाजीनगर' असा असणार आहे. या नव्या बससेवेमुळे ठाणेकरांना केवळ गारेगार प्रवासच मिळणार नाही, तर दुमजली बसमधून शहराचे दर्शन घेण्याचे कुतूहलही आता पूर्ण होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून या बसच्या प्रतीक्षेत असलेल्या ठाणेकरांसाठी ही पंधरा दिवसांची मुदत म्हणजे एक मोठी पर्वणीच ठरणार आहे.

'आम्ही रचतो तो इतिहास!'; वरळीच्या रणांगणातून शिंदेंची युवा सेनेला 'गाव तिथे शाखा'ची साद

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

"निवडणुकांचा धुराळा आता शांत झाला आहे, मात्र विश्रांतीसाठी ही वेळ नाही. आता खरी लढाई संघटना बांधणीची आहे. रणांगणात उतरा आणि 'गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक' हे अभियान राबवून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पुन्हा एकदा भगवा फडकवा," असा आक्रमक आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी युवा सेनेला दिला. वरळी येथे संपन्न झालेल्या 'महायुवोत्सव' सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी केवळ राजकीय दिशाच दिली नाही, तर तरुणांना नोकरी मागणारे नव्हे, तर नोकरी देणारे बनण्याचे आवाहन करत विकासाचा नवा 'रोडमॅप' मांडला.

शिंदे यांनी आपल्या भाषणात कार्यकर्त्यांमध्ये नवा जोश भरताना सांगितले की, भगवा हा केवळ रंग नसून तो आमच्या रक्तात आणि श्वासात आहे. बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या शिस्तीचा वारसा सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, शिवसैनिकाच्या वागण्या-बोलण्यातून तीच शिस्त दिसली पाहिजे. आपल्या राजकीय प्रवासाचा उल्लेख करताना ते म्हणाले, "मी मुख्यमंत्री असलो तरी आजही एक सामान्य कार्यकर्ताच आहे. या संघटनेत कोणी मालक नाही, सर्व समान आहेत. कष्टाच्या जोरावर शाखाप्रमुख ते मुख्यमंत्री असा प्रवास मी केला आहे आणि काम करणाऱ्या प्रत्येकाला इथे संधी मिळेल." त्यांनी २०२२ च्या राजकीय उठावाचा संदर्भ देत, शिवसेना फिनिक्स पक्षाप्रमाणे पुन्हा भरारी घेत असल्याचे ठामपणे सांगितले.

युवा सैनिकांना कामाची दिशा देताना त्यांनी मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण, बीएलए प्रक्रिया आणि सक्रिय सदस्य नोंदणीवर भर देण्यास सांगितले. "केवळ राजकारण न करता शेतकऱ्यांच्या बांधावर जा, त्यांच्या अश्रूंना हात द्या आणि संकटकाळी धावून जा," असे आवाहन त्यांनी केले. युवकांच्या रोजगारासाठी प्रताप सरनाईक यांच्या माध्यमातून ३००० बसस्टॉपवर स्टॉल उपलब्ध करून देण्यासारख्या उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. तसेच, चित्रपट, नाटक आणि वेब सिरीज यांसारख्या क्षेत्रांतही मराठी तरुणांनी आपले स्थान निर्माण करावे आणि त्यांना युवा सेनेने संरक्षण द्यावे, असे निर्देश त्यांनी दिले.

या कार्यक्रमात उल्लेखनीय कार्याबद्दल 'शिवगौरव' पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. युवा सेनेच्या नवीन संकेतस्थळाचे, 'युवा स्क्वॉड' उपक्रमाचे आणि नव्या युवागीताचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले. सर्वात आकर्षणाचे केंद्र ठरले ते म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मेणाच्या पुतळ्याचे अनावरण. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, नीलम गोऱ्हे, प्रताप सरनाईक यांसह महायुतीचे अनेक दिग्गज नेते आणि राज्यभरातून आलेला हजारो तरुणांचा समुदाय उपस्थित होता. "मेहनत आणि संघर्षाशिवाय विजय मिळत नाही," या मंत्रासह शिंदेंनी आगामी काळातील संघटनात्मक युद्धाचे रणशिंग फुंकले.

अमरावतीचे ते 'कलंकित' कॅफे! अयानच्या अश्लील कृत्यांचे केंद्र आणि पोलिसांच्या दुर्लक्षामुळे तरुणींचे आयुष्य उद्ध्वस्त?

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

अमरावतीच्या परतवाडा येथील तरुणींचे लैंगिक शोषण करून त्यांचे अश्लील व्हिडिओ व्हायरल करणाऱ्या अयानच्या प्रकरणाने संपूर्ण राज्य हादरले असतानाच, आता या गुन्ह्यातील एक काळे वास्तव समोर आलं आहे. मुख्य आरोपी अयान ज्या "द कॅफे रॉयल 10" मध्ये पीडित मुलींना घेऊन यायचा, ते कॅफे सुरुवातीपासूनच संशयाच्या भोवऱ्यात असल्याचे उघड झाले आहे. हे केवळ कॉफी पिण्याचे ठिकाण नसून, अश्लील कृत्यांचा अड्डा बनल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे.

विशेष म्हणजे, या कॅफेचा इतिहास अत्यंत वादग्रस्त असून यापूर्वीही पोलिसांनी येथे धाड टाकून काही मुला-मुलींना संशयास्पद स्थितीत ताब्यात घेतले होते. मात्र, त्यानंतरही अशा ठिकाणांवर ठोस कारवाई न झाल्याने अयानसारख्या नराधमांचे फावले आहे. अमरावतीच्या या विशिष्ट भागातील अनेक कॅफेंमध्ये बंद खोलीच्या नावाखाली मुला-मुलींचे अश्लील चाळे चालतात, हे आता लपून राहिलेले नाही. 'द कॅफे रॉयल 10' मधील त्या खासगी जागांचा वापर करूनच अयानने अनेक तरुणींना आपल्या जाळ्यात ओढले आणि त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त केले. या प्रकरणामुळे आता शहरातील अशा छुप्या अड्ड्यांवर पोलिसांचा हातोडा कधी पडणार, असा सवाल संतप्त नागरिक विचारत आहेत.

मंत्रालयात 'फाईल' नाट्य: फडणवीसांचा थेट सवाल, शिंदेंच्या खात्याची कोंडी?

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

राज्याच्या राजकारणात सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यातील सुप्त संघर्षाची चर्चा पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. निमित्त ठरलं आहे ते म्हणजे नगरविकास आणि गृहनिर्माण खात्यातील रखडलेल्या फाईली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या खात्यांचा आढावा घेताना, कोणत्या प्रकल्पांच्या फाईली नगरविकास खात्यात वर्षभरापासून पडून आहेत, असा रोखठोक सवाल विचारला. प्रकल्पाच्या नावासह या फाईली सादर करण्याचे आदेश त्यांनी अतिरिक्त मुख्य सचिवांना दिले, मात्र या आदेशानंतरही नोकरशहांची झालेली अस्वस्थता आणि फाईली पाठवण्यास झालेली टाळाटाळ यामुळे मंत्रालयात खळबळ उडाली आहे.

मुख्यमंत्र्यांनी जेव्हा या फाईली का रोखल्या गेल्या आणि त्या मुख्यमंत्री कार्यालयाकडे का आल्या नाहीत, असा जाब विचारला तेव्हा नगरविकास खात्याचे सचिव निरुत्तर झाले. खरे तर १९९५ पासून नगरविकास खाते नेहमी मुख्यमंत्र्यांनी स्वतःकडे ठेवण्याची परंपरा होती, मात्र २०२४ मध्ये फडणवीसांनी हे महत्त्वाचे खाते शिंदेंना दिले. गेल्या वर्षभरात या खात्याचे अनेक निर्णय वादाच्या भोवऱ्यात सापडले, ज्यावर सर्वोच्च न्यायालयानेही ताशेरे ओढले होते. अखेर मुख्यमंत्र्यांनी यातील काही प्रकल्पांना स्वतःहून ब्रेक लावल्याने दोन्ही नेत्यांमध्ये कुरघोडीचे राजकारण रंगल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

अजितदादांच्या निधनानंतर महायुतीतील संघर्ष काहीसा कमी झाल्याचे चित्र असतानाच, आता पुन्हा एकदा फाईलींच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्र्यांनी संताप व्यक्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शिंदेंनी जाणीवपूर्वक या फाईली रोखून धरल्या होत्या का, आणि या प्रकारानंतर आता शिंदे विरुद्ध फडणवीस हा सामना आणखी टोकदार होणार का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. महायुतीतील ही ठिणगी आगामी राजकारणात कोणता नवा वणवा पेटवणार, याचीच आता सर्वांना उत्सुकता आहे.

'मित्रा'आणि 'अर्थ डे नेटवर्क इंडिया' यांच्यात ५६ लाख वृक्षारोपण व उपक्रमांबाबत करार

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाची धोरणात्मक सल्लागार संस्था आलेल्या महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA) आणि अर्थ डे नेटवर्क इंडिया यांच्यात राज्यामध्ये पर्यावरणीय उपक्रम राबवण्यासाठी महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे. या कराराअंतर्गत ५६ लाख वृक्षारोपणासह विविध उपक्रम राबवून राज्यातील हवामान कृतीला (Climate Action) गती देण्यात येणार आहे.

पृथ्वी दिन २०२६ निमित्ताने करण्यात आलेला हा सामंजस्य करार शाश्वत विकासाची चौकट मजबूत करण्यासाठी तसेच नागरिक, संस्था आणि उद्योगांना हरित भविष्यासाठी एकत्र आणण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या भागीदारीत MITRA संस्थेकडून धोरणात्मक मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ दिले जाणार असून, अर्थ डे नेटवर्क इंडिया ही संस्था प्रत्यक्ष अंमलबजावणी, जनजागृती आणि लोकसहभाग वाढवण्याची जबाबदारी पार पाडणार आहे.

या सहकार्यांतर्गत महत्त्वाचे उपक्रम राबवले जाणार

मिशन लाइफ (Mission LiFE): नागरिकांच्या वर्तनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी राज्यव्यापी आराखडा

सरकारी ऊर्जा ऑडिट चॅलेंज: ऊर्जा कार्यक्षमता वाढवणे आणि ऊर्जेचा वापर कमी करण्यासाठी उत्तरदायित्व निश्चित करणे

आर्टिस्ट फॉर द अर्थ: हवामान बदलाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी कलाकार आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग

मुंबईला 'सस्टेनेबल इव्हेंट्स कॅपिटल' बनवणे: देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक स्तरावर शाश्वत कार्यक्रमांचे केंद्र म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न

फ्लॅगशिप उपक्रम : ५६ लाख वृक्षारोपण

या करारातील सर्वात महत्त्वाचा उपक्रम म्हणजे ५६ लाख वृक्षारोपण मोहीम. पृथ्वी दिनाला ५६ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने राज्यभरात ५६ लाख झाडांची लागवड करण्यात येणार आहे.

हा उपक्रम महाराष्ट्र शासनाच्या 'ग्रीनिंग महाराष्ट्र' अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या ३०० कोटी वृक्षारोपण मोहिमेचा एक भाग आहे.

ही मोहिमेत केवळ वृक्षलागवडीवरच नव्हे, तर झाडांचे जगण्याचे प्रमाण (Survival Rate), देखरेख आणि दीर्घकालीन पर्यावरणीय परिणाम यावर विशेष भर दिला जाणार आहे.

या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महाराष्ट्रात हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत विकासाच्या दिशेने एक ठोस आणि दूरदृष्टीपूर्ण पाऊल मानले जात आहे.

हवामान बदलाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने जागतिक स्तरावर पाऊल टाकले असून या उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राला देशातील 'क्लायमेट ॲक्शन लीडर' बनवण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

नेस्को सेंटर ड्रग्जप्रकरणी मुख्य आरोपीस अटक

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

गोरेगावच्या नेस्को सेंटरमधील ड्रग्जप्रकरणी आयुष विकी साहित्य (२४) नावाच्या आरोपीस वनराई पोलिसांनी अटक केली. त्याला बोरिवलीतील स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात आयुष हा नववा आरोपी आहे.

नेस्कोतील टेक्नो म्युझिक कॉन्सर्ट तथा ड्रग्ज पार्टीने एमबीएच्या दोन विद्यार्थ्यांचा बळी घेतला. आतापर्यंत ८ आरोपींना बेड्या ठोकल्यानंतर त्यांच्या चौकशीतून आयुष साहित्यचे नाव समोर आले. नेस्को कॉन्सर्टसाठी ड्रग्ज पुरवठा करणारा कल्याणचा आनंद पटेल याने उल्हासनगर येथे राहणाऱ्या आयुषकडून ड्रग्स खरेदी केल्याचे सांगितले होते. मात्र, तो फरार होता. मुंबई-गोवा महामार्गाने गोव्याला तो पळून जात असल्याची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखा यांनी संयुक्तपणे पोलादपूर येथे नाकाबंदी करून सापळा रचला आणि आयुषला पकडले. याच प्रकरणात अटक असलेल्या इतर आठ आरोपींना शनिवारी पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले. रौनक राहुल खंडेलवाल, आकाश बनमारी सामल, सनी विनोद जैन, बालकृष्णन बलराम कुरुप, प्रतिक बिजेश पांडे या पाचजणांना चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी तर आनंद लक्ष्मण पटेल, शुभ रामलखन यादव यांच्या पोलीस कोठडीत दोन दिवसांची वाढ करण्यात आली आहे.

महत्त्वाच्या बातम्या

मेट्रो ८ च्या सल्लागार नियुक्तीसाठी निविदा; २२,८६२ कोटी येणार खर्च

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

मुंबई विमानतळ आणि नवी मुंबई विमानतळाला जोडणाऱ्या मेट्रो ८ मार्गिकेच्या सल्लागार नियुक्तीसाठी सिडकोने निविदा प्रसिद्ध केली असून मेट्रो मार्गिकेच्या बांधकामासाठी सीआरझेड मंजरी, वनविभागाची परवानगी आणि इतर परवानग्या मिळवण्यासाठी हा सल्लागार नियुक्त केला जाईल. मेट्रो ८ मार्गिकेची उभारणी सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे केली जात आहे. या प्रकल्पासाठी २२,८६२ कोटी रुपये खर्च येणार आहे. वाशी खाडी पूल ओलांडल्यानंतर मानखुर्दपासून ही मेट्रो शीव-पनवेल महामार्गाला समांतर धावेल. त्यानंतर नेरूळ, सीवूड्स, उरण या मागनि नवी मुंबई विमानतळापर्यंत पोहोचेल. या मार्गावर २० स्थानके आहेत. यापैकी १४ स्थानके उचत असून ६ स्थानके भूमिगत आहेत. या मार्गिकेमुळे मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ हे अंतर केवळ ४० ते ४५ मिनिटांत पार करता येणे शक्य होईल.

मुंबईतील समुद्र किनाऱ्यावर जीवरक्षक तैनातीसाठी कोट्यवधीच्या निविदा

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यावर जीवरक्षक पुरवणाऱ्या संस्थेचे कंत्राट संपल्याने आता नव्या निविदा प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. यासाठी पालिकेच्यावतीने सुमारे २.७९ कोटी, २०.६९ कोटी आणि ४.७१ कोटी रुपयांच्या ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. या कंत्राटचा कालावधी तीन वर्षाचा असणार आहे. अशी माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे. मुंबई महापालिकेच्या अग्निशमन दलामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेनुसार, मुंबईतील गिरगाव चौपाटी, दादर चौपाटी, जुहू बीच, अक्सा बीच, गोराई बीच, मढ आयलंड बीच आणि वांद्रे बैंड स्टैंड आदी समुद्रकिनाऱ्यांवर जीवरक्षक सेवा पुरवणे, त्यांचे संचालन आणि देखभाल करणे असे काम अपेक्षित आहे. यासाठी परिमंडळनिहाय तीन स्वतंत्र निविदा काढण्यात आल्या आहेत. निविदा प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवली जात असून इच्छुक संस्थांना निर्धारित कालावधीत अर्ज सादर करावे लागणार आहेत. त्यानंतर तांत्रिक व आर्थिक निकषांनुसार कंत्राटदाराची निवड केली जाणार आहे.

म्हाडा फ्लॅटसाठी घेतलेल्या ३१ लाखांचा अपहार

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

म्हाडा फ्लॅटसाठी घेतलेल्या सुमारे ३१ लाखांचा अपहार करुन फसवणूक केल्याप्रकरणी एका पती-पत्नीविरुद्ध ना. म जोशी मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. नितीन अरुण शिंदे आणि प्रियांका नितीन शिंदे अशी या दोघांची नावे असून ते दोघेही साताऱ्याचे रहिवाशी आहे. यातील तक्रारदार त्यांच्या पत्नी आणि मुलासोबत लोअर परेल येथे भाड्याने राहतात. त्यांच्या आई-वडिलांचा जुहू येथे एक फ्लॅट होता. या फ्लॅटच्या विक्रीतून त्यांच्या वाटणीला ४० लाख रुपये आले होते. त्यातून त्यांना एक फ्लॅट खरेदी करायचा होता. त्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु होते, नितीनकडे गिरणी कामगाराना देण्यात आलेल्या म्हाडा फ्लॅटचे फाईल आहे. ज्या कामगारांना फ्लॅटची विक्री करायची आहे, त्यांचे फ्लॅट तो विक्री करुन देतो. तो त्यांन स्वस्तात लोअर परेल किंवा नायगाव परिसरात म्हाडा फ्लॅट घेऊन देईल असे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले. त्यामुळे त्यांनी नितीनची भेट घेतली होती. यावेळी त्याने त्याच्याकडे दोन म्हाडा फ्लॅटचे फाईल असल्याचे सांगून त्यांना त्यातील एक फ्लॅट ३८ लाखांना देण्याचे आश्वासन दिले होते.

ताज हॉटेलचे कार्ड देण्याची बतावणी करून फसवणूक; गुन्हा दाखल

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

ताज हॉटेलचा कार्ड देण्याची बतावणी करुन एका व्यावसायिकाची सायबर ठगाने सुमारे साडेसात लाखांची फसवणुक केल्याची घटना गावदेवी परिसरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी गावदेवी पोलिसांनी फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हा नोंदवून या ठगाचा शोध सुरु केला आहे. ६३ वर्षांचे तक्रारदार गावदेवी परिसरात राहतात. त्यांचा वडिलोपार्जित व्यवसाय आहे. त्यांच्याकडे अमेकिन एक्सप्रेसचे एक क्रेडिट कार्ड आहे. या कार्डचे सर्व व्यवहाराचे मॅसेज त्यांना त्यांच्या मोबाईलमध्ये येतात. १३ एप्रिलला ते त्यांच्या घरी होते. यावेळी त्यांना ॲमेझॉन साईटवर एचएसबीसी ताज हॉटेलची एक जाहिरात दिसली होती. त्या कार्डसाठी त्यांनी संबंधित जाहिरातीवर क्लिक केले होते. त्यानंतर तिथे एक फॉर्म ओपन झाला होता. त्यात त्यांनी त्यांची सर्व वैयक्तिक माहिती आणि क्रेडिट कार्डची माहिती अपलोड केली. त्यांना का अज्ञात व्यक्तीने व्हिडीओ कॉल केला होता. एचएसबीसी ताज हॉटेलच्या कार्ड मिळविण्यासाठी त्याने त्यांना रेफरन्ससाठी क्रेडिट कार्ड दाखविण्यास सांगितले होते.

अश्लील व्हिडीओ दाखवून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

मुंबई, दि. १९ प्रतिनिधी

अश्लील व्हिडीओ दाखवून एका सतरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर तिच्याच परिचित मित्राने लैंगिक अत्याचार केला. याप्रकरणी लैगिंक अत्याचारासह पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल होताच २० वर्षांच्या आरोपी मित्राला डी. एन नगर पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर त्याला दिडोशीतील विशेष सत्र न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. पिडीत मुलगी तिच्या कुटुंबियांसोबत अंधेरी परिसरात राहते. आरोपी हा तिच्याच शेजारी राहत असून ते एकमेकांच्या परिचित आहेत. त्यांची चांगली मैत्री होती. काही दिवसांपूर्वी तिचे आई-वडिल नवी मुंबईतील वाशी येथे फ्रूट आणण्यासाठी गेले होते. यावेळी ती तिच्या घरी एकटीच होती. ही संधी साधून आरोपी तिच्या घरी आला. त्याने तिला मोबाईलवर काही

मराठी अक्रॉस मुंबई

संपादकीय

संघर्षाच्या काळातील ऊर्जा

इराणविरोधातील विध्वंसक अमेरिका-इस्रायल संघर्षामुळे जगभरातील ऊर्जा पुरवठा विस्कळीत झाला आहे. श्रीमंत आणि गरीब अशा दोन्ही प्रकारच्या देशांतील सरकारे आपल्या नागरिकांना येणाऱ्या भीषण काळाबाबत सावध करत आहेत; असा काळ या पिढीने यापूर्वी कधी पाहिलेला नाही. ऊर्जा व इंधनाची अभूतपूर्व टंचाई, रेशनिंग, तसेच मोटारी व विमानांचे इंधन संपण्याचीही भीती व्यक्त होत आहे. प्रश्न असा आहे की, भविष्यातील ऊर्जा नकाशा कसा असेल? हा प्रश्न उपस्थित करताना, पडद्यावर दिसणाऱ्या हत्या, हजारो जीवितहानी आणि त्या असंवेदनशील विध्वंसाला हलक्यात घेऊ नये, अशी विनंती मी करीन. या ऊर्जा विस्कळीततेमुळे जगभर निर्माण झालेल्या वास्तविक वेदनेचाही कमी लेख करू नये. अनेक देश स्वयंपाकाच्या इंधनाच्या (एलपीजी) टंचाईला सामोरे जात आहेत आणि कुटुंबांना ते कोणत्याही किमतीत मिळवण्यासाठी आपल्या उत्पन्नाचा मोठा भाग खर्च करावा लागत आहे. इंधन केंद्रांवरील लांबच लांब रांगा आता सामान्य होत आहेत आणि त्यामुळे लोकांना कसाबसा परवडणारा खर्चही अधिक वाढत आहे. बहुतेक देशांमध्ये, विशेषतः विकसनशील जगात, इंधन आयात ही व्यापार तुटीवरील सर्वांत मोठी जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत तेलाच्या वाढत्या किमती अर्थव्यवस्थांना अपंग करणारा फटका देतात. त्याचवेळी जागतिक खत पुरवठ्यात निर्माण होणाऱ्या संभाव्य तुटवड्यामुळे शेतकऱ्यांवर मोठा आघात होण्याची शक्यता आहे. हेच शेतकरी आधीच हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या टोकाच्या हवामानाशी आणि बिघडलेल्या जागतिक अन्नधान्य किमतींशी झुंज देत आहेत. एकूणच जग गुडघ्यावर आले आहे; स्वतःच्या इच्छेने नव्हे, तर इराणविरोधातील या असंवेदनशील अमेरिका-इस्रायल संघर्षाला दिलेल्या भित्र्या आणि दयनीय प्रतिसादामुळे. नियमाधारित व्यवस्था आणि तिची सारी नैतिकता चिरडली गेली आहे. यामुळे आपल्या समोर प्रश्न उभा राहतो की, या धक्क्याचा ऊर्जाक्षेत्रावर नेमका काय परिणाम होणार? या अशोभनीय संघर्षापूर्वीही जग ऊर्जा संक्रमणाच्या प्रक्रियेत होते—वीज निर्मितीसाठी कोळशाऐवजी सातत्याने नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढत होता आणि वाहनांमध्ये पेट्रोल व डिझेलचा वापर कमी करण्याचे प्रयत्न सुरू होते. आंतरराष्ट्रीय नवीकरणीय ऊर्जा संस्थेच्या मार्च २०२६ च्या अहवालानुसार, २०२५ अखेर जगातील एकूण स्थापित वीज उत्पादन क्षमतेत नवीकरणीय ऊर्जेचा वाटा सुमारे ५० टक्के होता. विशेष म्हणजे हे ऊर्जा संक्रमण फक्त अपेक्षित भागांतच होत नव्हते—उदा. चीन किंवा युरोप. 'ॲम्बर' या विचारमंचाच्या अहवालानुसार, हवामान बदलास सर्वाधिक संवेदनशील असलेले ७४ देश 'इलेक्ट्रो-टेक' वेगाने स्वीकारत होते. त्यामागे हवामान बदलाविषयी चिंता हे कारण नव्हते, तर हा पर्याय अधिक जलद, स्वस्त आणि विश्वासार्ह होता. हे देश जीवाश्म इंधनाचा टप्पा वगळून थेट नवीकरणीय ऊर्जेकडे जाऊ शकतात. अहवालात म्हटले आहे की, सौरऊर्जा निर्मितीत नामिबिया आणि टोगो, बॅटरी विक्रीत जॉर्डन आणि किर्गिस्तान, तर विद्युत वाहन स्वीकृतीत नेपाळ आणि श्रीलंका आघाडीवर आहेत. सध्याच्या विस्कळीततेमुळे ऊर्जा आयातीचा खर्च वाढला असून, देशांना ऊर्जा सुरक्षेच्या गरजेची नव्याने जाणीव झाली आहे. तेल आणि वायू बाजारपेठा मिळवण्यासाठी पुन्हा चढाओढ सुरू झाली आहे. त्यामुळे देश स्वतःच्या संसाधनांचा—कोळशापासून चारकोलपर्यंत—अधिक वापर करू शकतात; मात्र हे दोन्ही प्रदूषणकारी आहेत. होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्याने जागतिक ऊर्जा प्रवाहातील सुमारे २० टक्के भाग बाधित झाला आहे. याचा अर्थ स्वस्त आणि मुबलक जीवाश्म इंधनाचा काळ संपत चालला आहे. आता स्वच्छ ऊर्जा संक्रमणाचा मुख्य आधार राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षा असेल. हे लिहिताना मला दुःखाने मान्य करावे लागते की, भविष्य सोपे असणार नाही. आजचा काळ सांगतो की, जागतिक समाज म्हणून आपण मागे सरकलो आहोत. मानवी विनाश आणि पतनाच्या या अवशेषांतून तुकडे गोळा करणे कठीण ठरणार आहे. अशा तुटलेल्या आणि विभागलेल्या जगात हवामान बदलासारख्या जागतिक समस्यांचे निराकरण करणे आपल्यासाठी अधिक कठीण होईल.

पुन्हा रखडले महिला आरक्षण

मोदी सरकारने संसदेच्या विशेष अधिवेशनात महिला आरक्षण लागू करण्यासाठी सर्व राज्यांमध्ये लोकसभा मतदारसंघांची संख्या ५० टक्क्यांनी वाढविण्याचा जो घटनादुरुस्ती विधेयक मांडला होता, तो विरोधकांच्या विरोधामुळे मंजूर होऊ शकला नाही आणि दोन-तृतीयांश बहुमताच्या अभावामुळे तो फेटाळला गेला. यासोबतच पुढील सार्वत्रिक निवडणुकीपासून म्हणजे २०२९ पासून लोकसभा व विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण लागू करण्याचा उपक्रमही थंडबस्त्यात गेला. असे यासाठी घडले की, प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसने दक्षिणेतील प्रादेशिक पक्षांप्रमाणे संकुचित भूमिका घेतली, तर समाजवादी पक्षासारख्या पक्षांनी महिला आरक्षणात ओबीसी व अल्पसंख्याक घटकांतील महिलांसाठी स्वतंत्र आरक्षणाची मागणी केली. काँग्रेस तसेच दक्षिण भारतातील पक्ष, विशेषतः तमिळनाडूमधील सत्ताधारी द्रमुक, यांनी असा आव आणला की जणू हे घटनादुरुस्ती विधेयक एखाद्या विशिष्ट राज्याच्या किंवा एखाद्या प्रदेशातील महिलांच्या हितासाठी आणले गेले आहे. प्रत्यक्षात हे विधेयक संपूर्ण देशातील महिलांना लोकसभा आणि विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी होते. एखादा लोकसभा सदस्य एखाद्या विधेयकावर मतदान करताना राष्ट्रीय हिताचा विचार करतो, एखाद्या राज्यापुरता नव्हे. महिला आरक्षण विधेयक २०२३ मध्ये या तरतुदीसह मंजूर झाले होते की, नव्या जनगणनेनंतर होणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर ते लागू केले जाईल. मात्र कोविडसह इतर कारणांमुळे २०२१ मध्ये होणारी जनगणना लांबत गेली. आता ती सुरू झाली आहे. तिचे निकाल येण्यास वेळ लागेल आणि त्यानंतर मतदारसंघ पुनर्रचना पूर्ण होईपर्यंत २०२९ निघून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे महिला आरक्षण २०३४ च्या लोकसभा निवडणुकीत लागू होण्याची शक्यता होती. याच कारणाने सरकारने ते लवकर लागू करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी लोकसभा जागा वाढविणाऱ्या १३१ व्या घटनादुरुस्ती विधेयकासोबत पुनर्रचनेसंबंधी दुरुस्ती विधेयक आणि केंद्रशासित प्रदेशांशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयक मांडण्यात आले. परंतु १३१ वे घटनादुरुस्ती विधेयकच मंजूर न झाल्याने उर्वरित दोन्ही विधेयके अर्थहीन ठरली. सध्याच्या लोकसभा जागा १९७१ च्या जनगणनेनंतर झालेल्या पुनर्रचनेनुसार वाढविण्यात आल्या होत्या. त्यानंतर त्या जशाच्या तशा आहेत, कारण पुनर्रचना करून जागा वाढविण्याची प्रक्रिया गोठविण्यात आली होती. १९७१ मध्ये भारताची लोकसंख्या सुमारे ५५ कोटी होती. आता ती १४० कोटींवर पोहोचली आहे, तरी लोकसभा जागा केवळ ५४३च आहेत. त्यामुळे एका खासदाराला अधिक लोकांचे प्रतिनिधित्व करावे लागते. काही ठिकाणी ही संख्या ४५ लाखांहून अधिक आहे. पुनर्रचना स्थगित ठेवण्यामागील एक मोठे कारण दक्षिणेकडील राज्यांचा हा युक्तिवाद होता की, त्यांनी लोकसंख्या नियंत्रणात यश मिळवले असून लोकसंख्येच्या आधारावर पुनर्रचना झाल्यास उत्तर भारताच्या तुलनेत लोकसभेतील त्यांचे प्रतिनिधित्व कमी होईल. मात्र प्रश्न असा आहे की, नव्या जनगणनेनंतर पुनर्रचना होताना तेच हट्ट पुन्हा धरणार का? काहीही असो, महिला आरक्षणाशी संबंधित विधेयकाच्या विरोधामागील आपली भूमिका योग्य का होती, हे विरोधी नेते स्पष्ट करू शकले नाहीत. हे विधेयक फेटाळले गेल्याने विरोधक असे म्हणू शकतात की त्यांनी सरकारच्या मनसुब्यांवर पाणी फेरले, परंतु त्यांनी महिला आरक्षण लागू होऊ दिले नाही, हे जनतेला समजावणे त्यांच्यासाठी कठीण ठरेल. महिला आरक्षणाचा प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर भाजप विरोधकांच्या भूमिकेचा राजकीय लाभ घेण्याचा पूर्ण प्रयत्न करेल आणि त्यांना महिला हितविरोधी ठरविण्यात कसूर करणार नाही, हे निश्चित आहे. काँग्रेस काहीही दावा करो, वास्तव असे आहे की तिचा पाया कमकुवत होत चालला आहे. प्रस्तावित ८१६ जागांवर समर्थ उमेदवार उभे करणे आणि त्यांना प्रभावीपणे निवडणूक लढविणे, एवढी ताकद तिच्याकडे नाही. तिच्या तुलनेत भाजपचे संघटन अधिक मजबूत आहे. महिला आरक्षणासाठी विशेष अधिवेशन बोलावण्याचा निर्णय घेताना मोदी सरकारला विरोधक अडथळे आणतील, याची जाणीव असणारच. सरकार संभाव्य परिणामांना सामोरे जाण्यास तयार होते, अन्यथा ते असे राजकीय जोखीम घेतले नसते. ही जोखीम त्यांनी यासाठी घेतली की अपयश आल्यास विरोधकांविरोधात कथानक उभारणे सोपे जाईल. विरोधकांनी त्यांना ही संधी स्वतःहून दिली. निःसंशयपणे महिलांच्या राजकारणातील वाढत्या सहभागामुळे राजकीय व प्रशासकीय स्तरावर सुधारणा झाली असती. पंचायत राज व्यवस्थेत त्यांच्या सहभागामुळे वातावरण बदलले आहे. सरपंच आणि पंचायत प्रमुख म्हणून त्या चांगले कार्य करत आहेत. जेव्हा पंचायतांमध्ये महिलांसाठी ५० टक्क्यांपर्यंत जागा राखीव होऊ शकतात, तेव्हा लोकसभा व विधानसभांमध्ये ३३ टक्के जागा राखीव का होऊ शकत नाहीत विरोधकांचा एक युक्तिवाद असा होता की, सरकारने विद्यमान लोकसभा जागांमध्येच महिला आरक्षण लागू करावे. मात्र अशी काही पहल झाली असती तरीही विरोधक मागे हटले नसते, कारण त्यांचे पुरुष खासदार त्यासाठी तयार झाले नसते. प्रत्यक्षात सर्व राज्यांमध्ये लोकसभा जागा ५० टक्क्यांनी वाढवून महिला आरक्षण लागू करण्याची योजना अधिक योग्य मार्ग होता. असे वाटते की, विरोधकांनी कोणत्याही परिस्थितीत महिला आरक्षणाचा उपक्रम हाणून पाडायचाच निर्धार केला होता. सरकारच्या उपक्रमाच्या विरोधात त्यांनी दिलेले अनेक युक्तिवाद पोकळच ठरले.

भारताला 'अल्ट्रा-प्रोसेस्ड' अन्नाचा विळखा: चव जिभेला, धोका शरीराला

असंसर्गजन्य आजार म्हणजे हृदयविकार, मधुमेह, कर्करोग आणि दीर्घकालीन श्वसनविकार यांसारखे आजार आज जगभरातील जवळपास तीन चतुर्थांश मृत्यूंसाठी कारणीभूत ठरत आहेत. हे आजार आरोग्य व्यवस्थांसाठीच नव्हे तर आर्थिक विकासासाठीही मोठे आव्हान बनले आहेत. बदलता येऊ शकणाऱ्या जोखीम घटकांमध्ये अयोग्य आहार (unhealthy diets) आहार हे एक मुख्य कारण म्हणून पुढे आले आहे. वाढते संशोधन असे सूचित करते की अल्ट्रा प्रोसेस्ड अन्नपदार्थांचा वाढता वापर असंसर्गजन्य आजारांच्या वाढत्या भारामागील एक महत्त्वाचा घटक आहे.

अल्ट्रा-प्रोसेस्ड फूड्स (UPFs) हे प्रामुख्याने कारखान्यांमध्ये प्रक्रिया करून तयार केलेले असे पदार्थ आहेत, जे शुद्ध केलेले अन्न घटक (Refined substances), ॲडिटिव्हज आणि प्रिझर्व्हेटिव्हज (टिकवणारी द्रव्ये) वापरून बनवले जातात. यामध्ये नैसर्गिक किंवा संपूर्ण अन्न घटकांचा (Whole-food) वापर अत्यल्प किंवा अजिबात नसतो. या उत्पादनांमध्ये सॅच्युरेटेड फॅट्स, साखर आणि सोडियमचे (मीठ) प्रमाण खूप जास्त असते, तर तंतुमय पदार्थ (फायबर), प्रथिने आणि अत्यावश्यक सूक्ष्म पोषक तत्वांचे प्रमाण अत्यंत कमी असते. या अन्नपदार्थांचा वाढता वापर हा पोषण संक्रमणाशी जोडलेला आहे, म्हणजे पारंपरिक आणि कमी प्रक्रिया केलेल्या आहारातून जास्त ऊर्जा असलेल्या आणि सहज उपलब्ध अन्नाकडे होणारा बदल. हा बदल नागरीकरण, वाढते उत्पन्न, जागतिक अन्नप्रणाली, आक्रमक जाहिरात आणि बदलती जीवनशैली यांमुळे वेगाने घडत आहे. भारतासह कमी व मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये हा बदल खूप झपाट्याने झाला असून, त्यासोबत योग्य नियामक उपाय नसल्यामुळे कुपोषणाचा दुहेरी भार वाढला आहे, जिथे अपुरे पोषण आणि आहाराशी संबंधित असंसर्गजन्य आजार एकाच वेळी आढळतात.

आजारांना निमंत्रण देणाऱ्या बदलता येण्याजोग्या प्रमुख कारणांमध्ये अयोग्य आहार हा मुख्य घटक म्हणून समोर आला आहे. वाढत्या पुराव्यांवरून हे स्पष्ट होत आहे की, अल्ट्रा-प्रोसेस्ड पदार्थ (UPFs) हे असंसर्गजन्य आजारांच्या (NCDs) वाढत्या विळख्याला कारणीभूत ठरणारे सर्वात मोठे घटक आहेत.

आहारातील बदलांमुळे होणाऱ्या आरोग्य परिणामांचे भारत हे एक ठळक उदाहरण ठरते. ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज अहवालानुसार, आहाराशी संबंधित जोखीम घटक हे भारतातील असंसर्गजन्य आजारांमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या प्रमुख कारणांपैकी आहेत, विशेषतः हृदयविकार आणि मधुमेहाच्या बाबतीत. केवळ हृदयविकारांमुळेच 2016 मध्ये देशातील एकूण मृत्यूंपैकी एक चतुर्थांशाहून अधिक मृत्यू झाले होते, तर 1990 ते 2019 या काळात असंसर्गजन्य आजारांमुळे होणाऱ्या अकाली मृत्यूंचे प्रमाण दुप्पट झाले आहे. राष्ट्रीय सर्वेक्षणांमधून शहरी तसेच ग्रामीण भागात जादा वजन आणि स्थूलतेत मोठी वाढ झाल्याचे दिसून येते. 2005 ते 2006 आणि 2019 ते 2020 या कालावधीत प्रौढांमधील जादा वजन आणि स्थूलतेचे प्रमाण दहा टक्क्यांहून अधिक वाढले आहे. मुलांमध्ये आणि किशोरवयीनांमध्येही ही प्रवृत्ती चिंताजनक आहे. लहान वयात स्थूलता आढळल्यास आयुष्यभर मधुमेह आणि हृदयविकारांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. भारतातील आहारपद्धतींच्या अभ्यासातून सातत्याने हे स्पष्ट होते की गोड पदार्थ, खारट स्नॅक्स आणि प्रक्रिया केलेल्या कर्बोदकांचे (Refined Carbs) प्रमाण जास्त असलेला आहार टाइप 2 मधुमेह आणि हृदयाशी संबंधित चयापचय विकारांच्या वाढत्या धोक्याशी जोडलेला आहे.

हे बदल अल्ट्रा प्रोसेस्ड अन्नपदार्थांची वाढती उपलब्धता, परवडणारी किंमत आणि तीव्र प्रचार याचेच प्रतिबिंब आहेत.

बाजाराच्या अभ्यासातून असे दिसते की अल्ट्रा प्रोसेस्ड अन्नपदार्थांची वाढ ही पारंपरिक किंवा कमी प्रक्रिया केलेल्या अन्नाच्या तुलनेत अधिक वेगाने होत आहे. यामागे सोयीस्कर वापर, जास्त काळ टिकणारी उत्पादने आणि आक्रमक जाहिरात हे कारणीभूत आहेत. जागतिक पातळीवर बहुराष्ट्रीय अन्न कंपन्या कमकुवत नियमावली आणि वाढती ग्राहक मागणी यांचा फायदा घेत उदयोन्मुख देशांकडे अधिक लक्ष देत आहेत. अनेक अभ्यासांमधून हे दिसून आले आहे की अयोग्य अन्नाच्या जाहिरातींचा संपर्क, विशेषतः डिजिटल आणि सोशल मीडियामधून, ग्राहकांच्या आवडी, खरेदीचे निर्णय आणि खाण्याच्या सवयींवर मोठा प्रभाव टाकतो. हा प्रभाव विशेषतः मुलांमध्ये आणि किशोरवयीनांमध्ये अधिक दिसून येतो. लहान वयात अशा अन्नाचा संपर्क झाल्यास पुढील आयुष्यात स्थूलता आणि चयापचयाशी संबंधित आजारांचा धोका अधिक वाढतो.

लहान वयात अल्ट्रा प्रोसेस्ड अन्नपदार्थांचा संपर्क झाल्यास पुढील आयुष्यात स्थूलता तसेच चयापचयाशी संबंधित आजारांचा धोका अधिक वाढतो.

साथरोगशास्त्रीय संशोधनातून मिळालेला मजबूत पुरावा अल्ट्रा प्रोसेस्ड अन्नपदार्थांचे जास्त सेवन आणि खराब आरोग्य परिणाम यांच्यात स्पष्ट संबंध दर्शवतो. युरोप आणि अमेरिकेतील दीर्घकालीन अभ्यासांमधून असे आढळले आहे की अशा अन्नाचे अधिक सेवन केल्यास हृदयविकार, कोरोनरी हृदयरोग आणि मेंदूतील रक्तवाहिन्यांशी संबंधित घटनांचा धोका वाढतो. सर्व कारणांमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या प्रमाणाशीही याचा संबंध दिसून आला आहे. एका नियंत्रित वैद्यकीय चाचणीतून (Randomised Controlled Trial) असे सिद्ध झाले आहे की, ज्या व्यक्तींनी अल्ट्रा-प्रोसेस्ड (अतिप्रक्रिया केलेले) पदार्थ खाल्ले, त्यांनी नैसर्गिक किंवा कमी प्रक्रिया केलेल्या अन्नाच्या तुलनेत खूप जास्त कॅलरीज घेतल्या आणि त्यांचे वजनही वाढले. या संशोधनातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, दोन्ही प्रकारच्या आहारांमध्ये साखर, मीठ, फायबर आणि इतर मुख्य पोषक तत्वे (Macronutrients) समान असूनही हा फरक दिसून आला. यावरून असे सूचित होते की केवळ पोषणघटकांची रचना नव्हे, तर अन्नाची पोत, चव, खाण्याचा वेग आणि अन्नाची एकूण रचना हे घटकही जास्त ऊर्जा सेवनाला चालना देतात. विविध प्रणालीबद्ध अभ्यासांनी अल्ट्रा प्रोसेस्ड अन्नाचे सेवन स्थूलता, मेटाबॉलिक सिंड्रोम, टाइप 2 मधुमेह आणि उच्च रक्तदाबाशी जोडले असल्याचेही स्पष्ट केले आहे. नव्या संशोधनातून हेही समोर येत आहे की अशा अन्नामुळे अनेक आजार एकत्र होण्याचा धोका वाढतो, ज्यामुळे आयुष्यभर असंसर्गजन्य आजारांचा एकत्रित भार वाढतो.

इतके ठोस पुरावे असूनही, अनेक देशांमध्ये अल्ट्रा प्रोसेस्ड अन्नाबाबतची धोरणे पुरेशी प्रभावी ठरलेली नाहीत. विस्कळीत नियमावली, सक्तीच्या उपायांऐवजी ऐच्छिक पद्धतींवर भर, तसेच आर्थिक निर्बंधांचा अभाव यामुळे अयोग्य अन्नाचे सेवन कमी करण्यात मर्यादा येत आहेत. संशोधनातून असे दिसते की पॅकेटच्या समोर स्पष्ट इशारा देणारी लेबल्स, मुलांना लक्ष्य करणाऱ्या जाहिरातींवर बंदी, आणि साखरयुक्त पेयांवर कर लावणे यांसारख्या उपायांमुळे अल्ट्रा प्रोसेस्ड अन्नाची खरेदी प्रभावीपणे कमी होऊ शकते आणि लोकांच्या आहार निवडी सुधारू शकतात. चिलीसारख्या देशांचा अनुभव दाखवतो की सक्तीची चेतावणी लेबल्स आणि जाहिरात निर्बंध असलेले सर्वसमावेशक नियम ग्राहकांचे वर्तन बदलू शकतात आणि कंपन्यांना उत्पादनांमध्ये सुधारणा करण्यास भाग पाडू शकतात. कॅनडाने आपल्या अन्नविषयक कायद्यात सुधारणा केल्या आहेत, तर युनायटेड किंगडमने अशा निर्बंधांची अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या संप्रेषणविषयक कायद्यात बदल केले आहेत.

UPFs आणि NCDs यांच्यातील या संबंधावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी कडक नियम, आर्थिक उपाय, ग्राहकांमध्ये जनजागृती, जाहिरात व विपणनावर योग्य नियंत्रण आणि अन्न उद्योगांची जबाबदारी ठरवणारा सर्वसमावेशक अन्नप्रणालीचा दृष्टिकोन आवश्यक आहे.

अल्ट्रा प्रोसेस्ड अन्नपदार्थ (UPFs) हे जागतिक पातळीवर वाढत चाललेल्या असंसर्गजन्य आजारांचे (NCDs) एक मुख्य कारण ठरत आहेत. साथरोगशास्त्रीय अभ्यास, वैद्यकीय चाचण्या आणि अन्नप्रणालीवरील संशोधनातून मिळालेल्या पुराव्यांवरून असे स्पष्ट होते की आधुनिक आहारात UPFs चे वाढते प्रमाण स्थूलता, मधुमेह, हृदयविकार आणि अकाली मृत्यू यांच्या वाढत्या संख्येशी जोडलेले आहे. UPFs आणि NCDs यांच्यातील या संबंधावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी कडक नियम, आर्थिक उपाय, ग्राहकांमध्ये जनजागृती, जाहिरात व विपणनावर योग्य नियंत्रण आणि अन्न उद्योगांची जबाबदारी ठरवणारा सर्वसमावेशक अन्नप्रणालीचा दृष्टिकोन आवश्यक आहे. प्रक्रिया केलेल्या अन्नाविषयीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आरोग्यदायी अन्न व पेयांची सरकारी खरेदी सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून रुग्णालये, शाळा, शासकीय कार्यालये आणि विद्यापीठे यांसारख्या संस्थांमध्ये एकसारखी आणि आरोग्यपूरक खरेदी पद्धत राबवता येईल. अल्ट्रा प्रोसेस्ड अन्नावरचे अवलंबित्व कमी करून कमी प्रक्रिया केलेल्या आणि पोषक घटकांनी समृद्ध आहाराला प्रोत्साहन देणे हे केवळ तातडीचे सार्वजनिक आरोग्य उद्दिष्ट नसून, शाश्वत विकास आणि दीर्घकालीन लोकसंख्येच्या आरोग्यासाठीही अत्यावश्यक आहे.

हवामान संकटाची खरी कसोटी: भारताची आरोग्य व्यवस्था तयार आहे का?

हवामान बदल हा आज जगभर मानवी आरोग्यासाठी मोठा धोका ठरला आहे. सुमारे 3.6 अब्ज लोक असे भागात राहतात जिथे हवामान बदलाचा परिणाम अत्यंत तीव्र आहे, आणि त्यांना थेट तसेच अप्रत्यक्ष आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे. उष्णतेच्या लाटा, वादळे आणि पूर यांसारख्या अतिवृष्टी व अतिउष्णतेच्या घटनांबरोबरच वाढते प्रदूषण आरोग्यावर वाईट परिणाम करते आणि मृत्यूचे प्रमाण वाढवते. यामुळे अन्नप्रणालींमध्ये अडथळे निर्माण होतात आणि पोषणावर परिणाम होतो. झूनोसिसचे प्रमाण वाढते, तसेच अन्नातून, पाण्यातून आणि कीटकांद्वारे पसरणारे आजार अधिक दिसून येतात. यासोबतच चांगल्या आरोग्यास आधार देणारे अनेक सामाजिक घटक कमकुवत होतात, आणि एकूण आरोग्याचा ताण वाढतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, 2030 ते 2050 या काळात हवामान बदलामुळे दरवर्षी सुमारे 2,50,000 अतिरिक्त मृत्यू होऊ शकतात. तसेच आरोग्यावर होणाऱ्या थेट नुकसानीचा खर्च अंदाजे 2 ते 4 अब्ज अमेरिकी डॉलर्स इतका असू शकतो, ज्यात कृषी, पाणी आणि स्वच्छता यांसारख्या क्षेत्रांतील खर्च समाविष्ट नाही.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, 2030 ते 2050 या काळात हवामान बदलामुळे दरवर्षी सुमारे 2,50,000 अतिरिक्त मृत्यू होऊ शकतात. तसेच आरोग्यावर होणाऱ्या थेट नुकसानीचा खर्च अंदाजे 2 ते 4 अब्ज अमेरिकी डॉलर्स इतका असू शकतो, ज्यात कृषी, पाणी आणि स्वच्छता यांसारख्या क्षेत्रांतील खर्च समाविष्ट नाही.

जरी हवामान बदलाचे परिणाम सर्वांनाच जाणवणार असले, तरी त्याचा सर्वाधिक फटका आधीपासूनच असुरक्षित आणि वंचित गटांना बसतो. यामध्ये महिला व मुले, अल्पसंख्याक, स्थलांतरित व विस्थापित व्यक्ती, वृद्ध, आर्थिकदृष्ट्या दुर्बल समुदाय आणि आधीपासून आजार असलेले लोक यांचा समावेश होतो. या घटकांवर हवामानाशी संबंधित आजारांचा भार इतरांच्या तुलनेत जास्त प्रमाणात पडतो. यामुळे विकास, जागतिक आरोग्य, दारिद्र्यनिर्मूलन, आरोग्यविषयक असमानता कमी करणे आणि सार्वत्रिक आरोग्य संरक्षण साध्य करण्यासाठी गेल्या काही दशकांत झालेली प्रगती धोक्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेने स्पष्ट केले आहे की ज्या भागांमध्ये आरोग्य पायाभूत सुविधा कमकुवत आहेत, तेथे हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या वाढत्या आरोग्य संकटांना तोंड देण्याची क्षमता सर्वात कमी असेल.

हवामान आणि आरोग्याच्या टोकावर उभा भारत

भारतात ही गंभीर स्थिती आधीच दिसून येत आहे. सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंटच्या अभ्यासानुसार, 2025 च्या पहिल्या नऊ महिन्यांत अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा आणि इतर टोकाच्या हवामान घटनांमुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये मागील चार वर्षांच्या तुलनेत 48 टक्क्यांची वाढ झाली. 273 पैकी 270 दिवस टोकाच्या हवामान घटना नोंदल्या गेल्या. यामध्ये उष्ण व थंडीच्या लाटा, वीज कोसळणे व वादळे, मुसळधार पाऊस, पूर आणि भूस्खलन यांचा समावेश होता, ज्यामध्ये एकूण 4064 पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला. राज्यनिहाय फरक स्पष्ट दिसून आला. हिमाचल प्रदेशात सर्वाधिक परिणाम दिसून आला, जिथे 217 दिवस टोकाच्या हवामान घटना घडल्या आणि 380 मृत्यू झाले. केरळमध्ये 147 दिवस अशा घटना नोंदल्या गेल्या आणि 114 मृत्यू झाले, तर मध्य प्रदेशात 144 दिवस टोकाच्या घटना घडून 532 मृत्यू झाले. आणखी एका अभ्यासानुसार, भारतातील एकूण मृत्यूंपैकी 7.29 टक्के मृत्यू तापमानाशी संबंधित होते. 2001 ते 2013 या काळात सर्व वयोगटांतील वैद्यकीय मृत्यूंपैकी 6.8 टक्के थंड तापमानामुळे आणि 0.5 टक्के उष्णतेमुळे झाले. गेल्या दोन दशकांत आपत्तींच्या संख्येतही मोठी वाढ झाली आहे.

याशिवाय, 2024 मध्ये लोकसंख्या लक्षात घेऊन मोजलेल्या PM2.5 पातळीच्या आधारावर भारत जगात पाचव्या क्रमांकावर होता. मध्य आणि दक्षिण आशियातील सर्वाधिक प्रदूषित 15 शहरांपैकी 10 शहरे भारतात होती. केवळ राजधानी दिल्लीमध्येच 2023 साली एकूण मृत्यूंपैकी सुमारे 15 टक्के म्हणजेच 17,188 मृत्यू वायूप्रदूषणामुळे झाले, असा अंदाज ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. हा आकडा 2018 पासून 8.9 टक्क्यांनी वाढलेला आहे. येल विद्यापीठाच्या 2024 च्या एन्व्हायर्नमेंटल परफॉर्मन्स इंडेक्सनुसार, स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत भारत 180 देशांपैकी 143 व्या क्रमांकावर आहे. तसेच, नीती आयोगाच्या 2018 च्या अहवालानुसार सुरक्षित पाण्याच्या अपुऱ्या उपलब्धतेमुळे दरवर्षी सुमारे 0.2 दशलक्ष मृत्यू होतात. 2030 पर्यंत सुमारे 60 कोटी लोक, म्हणजेच भारताच्या अपेक्षित लोकसंख्येच्या सुमारे 40 टक्के लोकांना पाण्याच्या ताणाला सामोरे जावे लागू शकते.

2025 च्या पहिल्या नऊ महिन्यांत, मागील चार वर्षांच्या तुलनेत भारतात टोकाच्या हवामान घटनांमुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये सुमारे 48 टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे.

अप्रत्यक्ष परिणामांच्या दृष्टीने पाहता, द लॅन्सेटच्या माहितीनुसार भारतात Aedes albopictus या डासामार्फत डेंग्यू पसरण्याची क्षमता दर्शवणारा R_0 निर्देशांक जवळपास दुप्पट झाला आहे. 1951 ते 1960 या काळात हा निर्देशांक 0.86 होता, तो 2015 ते 2024 या कालावधीत 1.60 पर्यंत वाढला आहे. हा बदल सातत्याने डेंग्यू साथी पसरण्यास पोषक ठरणाऱ्या पर्यावरणीय परिस्थितीचे द्योतक आहे. 2024 पर्यंत, भारताच्या किनारी भागांमध्ये Vibrio संसर्गांसाठी अनुकूल वातावरण असलेल्या क्षेत्रांचा वाटा 1982 ते 2010 या आधारकालावधीच्या तुलनेत 46 टक्क्यांनी वाढला होता. यावरून समुद्राच्या तापमानवाढीसोबत किनारी भागांतील जलजन्य आजारांचा धोका लक्षणीयरीत्या वाढत असल्याचे दिसून येते.

आगामी काळात हवामान बदलामुळे हा आरोग्यभार आणखी वाढण्याची शक्यता आहे. हवामान बदलामुळे वाढणारे आजारपण आणि मृत्यू लक्षात घेता, पुरेशा आणि प्रभावी सेवा देण्यासाठी आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करणे हे भारताच्या हवामान अनुकूलन धोरणातील एक महत्त्वाचे अंग असायला हवे.

भारताच्या हवामान अनुकूलन धोरणातील आरोग्य घटक

गेल्या काही वर्षांत भारताने हवामान बदलाचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम हाताळण्यासाठी विविध पावले उचलली आहेत. 2019 मध्ये आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाने राष्ट्रीय हवामान बदल व मानवी आरोग्य कार्यक्रम सुरू केला. या कार्यक्रमाचा उद्देश हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांना सामोरे जाण्यासाठी आरोग्य व्यवस्थेची क्षमता वाढवणे, तयारी मजबूत करणे आणि प्रतिसाद अधिक प्रभावी बनवणे हा आहे. या उपक्रमांतर्गत, राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित हवामान बदल व मानवी आरोग्यासाठी राज्य कृती आराखडे 2023 मध्ये तयार करण्यात आले. या आराखड्यांमध्ये असुरक्षित जिल्ह्यांची ओळख करून उष्णतेच्या लाटा, वायूप्रदूषण, वाहकांमार्फत पसरणारे आजार आणि टोकाच्या हवामान घटनांसाठी आरोग्य अनुकूलन आराखडे तयार करण्याची जबाबदारी राज्यांना देण्यात आली आहे. राज्यांनी लवकर इशारा देणाऱ्या प्रणाली विकसित करणे, आरोग्य व्यवस्थेची तयारी वाढवण्यासाठी उपाययोजना आखणे आणि टोकाच्या हवामान परिणामांना तोंड देण्यासाठी धोरणे राबवणे अपेक्षित होते. त्यासोबतच हरित आणि हवामानास अनुरूप आरोग्य पायाभूत सुविधा उ

महिला व बालविकास विभागातील पदभरतीचे निकाल जाहीर करण्याच्या प्रक्रियेस गती द्यावी - आदिती तटकरे

मुंबई, प्रतिनिधी

महिला व बालविकास विभागातील विविध पदांच्या भरती प्रक्रियेला वेग देण्यात यावा. विशेषतः वर्ग ३ व ४ च्या सरळसेवा भरती प्रक्रियेसंदर्भात परीक्षांचे निकाल तातडीने जाहीर करण्याच्या सूचना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या.

पदभरती प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात झालेल्या बैठकीत सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त माधवी सरदेशमुख तसेच सहसचिव वि. रा. ठाकूर, उपायुक्त गिरासे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, विभागातील विविध पदांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षा निकाल अंतिम टप्प्यात असून, निकाल जाहीर झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात पदभरती करण्यात येणार आहे. त्यामुळे विभागातील रिक्त पदे भरून सेवा वितरण अधिक सक्षम आणि गतिमान होणार आहे.

मंत्री आदिती तटकरे यांनी भरती प्रक्रिया पारदर्शक, वेळेत आणि कार्यक्षम पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देत, निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया गतीमान करण्याचे निर्देश दिले. या निर्णयामुळे महिला व बालविकास विभागाच्या कामकाजाला अधिक बळकटी मिळणार असून नागरिकांना मिळणाऱ्या सेवांमध्येही गुणवत्ता वाढणार आहे.

राज्यासाठी १ लाख ७५ हजार कोटींचे गुंतवणूक करार

एकट्या जेडब्ल्यू ग्लोबल कंपनीची १ लाख ६५ हजार कोटींची गुंतवणूक

मुंबई, प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत गुरुवारी उद्योग विभागाने तब्बल १ लाख ७३ हजार कोटींच्या औद्योगिक गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले. त्यानुसार शाश्वत ऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये कार्यरत असलेला जेडब्ल्यू ग्लोबल उद्योग समूह राज्यात तब्बल १ लाख ६५ हजार कोटींची गुंतवणूक करणार आहे. तर पश्चिम बंगालमधील श्याम स्टील उद्योग समूह चंद्रपूर जिल्ह्यात १० हजार कोटींची गुंतवणूक करून स्टील उद्योग उभारणार आहे.

जेडब्ल्यू ग्लोबल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनी राज्यात जवळपास एक लाख ६५ हजार कोटींची गुंतवणूक करीत आहे. सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणात फ्लोटिंग सोलर पावर अँड एनर्जी स्टोरेजच्या माध्यमातून कंपनी १४ हजार ९७६ कोटींची गुंतवणूक करीत असून त्यामुळे कायमस्वरूपी ५०० रोजगार निर्मिती होणार आहे. तसेच शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्ता कॅम्पस आणि डाटा सेंटर, ग्रीन हायड्रोजन प्रकल्प, स्मॉल मॉड्युलर न्यूक्लिअर रिऍक्टर या क्षेत्रात जेडब्ल्यू ग्लोबल उद्योग समूह गुंतवणूक करीत आहे. या संपूर्ण गुंतवणुकीमुळे राज्यात जवळपास ३ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

तर श्याम स्टील उद्योग समूह चंद्रपूर जिल्ह्यात गोडपिंपरी तालुक्यामध्ये १० हजार कोटीची गुंतवणूक करून स्टील उद्योग उभारत आहे. या माध्यमातून जवळपास ८ हजार पेक्षा जास्त रोजगार निर्मिती होणार आहे. दरम्यान, राज्यात गुंतवणूक येऊन त्याचे उद्योगात रूपांतर करण्यासाठी अनेक धोरणात्मक सुधारणा करण्यात आल्या आहेत. राज्य सरकार महाराष्ट्रामध्ये उद्योग उभारण्यासाठी गुंतवणूकदारांना पुरेपूर सहकार्य करीत आहे. त्यामुळे राज्यामध्ये सद्यस्थितीत उद्योगांचे नवे पर्व सुरू झाल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

राज्यात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दाखविलेल्या उद्योग समूहांना प्रत्यक्षपणे उद्योग सुरू करण्यास सुटसुटीत प्रक्रिया करण्यात आली आहे. राज्याच्या कुठल्याही भागामध्ये गुंतवणूक करण्यास स्वारस्य दाखवल्यास राज्य सरकार संबंधित उद्योग समूहाला पुरेपूर सहकार्य करेल, अशी ग्वाही फडणवीस यांनी यावेळी दिली.

बोगस कॉल सेंटरच्या रॅकेटमध्ये पोलीस अधिकाऱ्यांचा सहभाग

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा खळबळजनक आरोप

मुंबई, प्रतिनिधी

झारखंडच्या 'जमतारा' प्रमाणेच महाराष्ट्रातही बोगस कॉल सेंटरच्या माध्यमातून जगभरातील नागरिकांना फसवून शेकडो कोटी रुपयांचा गोरखधंदा सुरु आहे. अशा बोगस कॉल सेंटरच्या रॅकेटमध्ये आयपीएस अधिकारी दत्ता कराळे आणि दोन पोलीस अधीक्षक यांचाही सहभाग असल्याचा खळबळजनक आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी येथे पत्रकार परिषदेत बोलताना केला. या रॅकेटला मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरचा आशीर्वाद असल्याशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणात बोगस कॉलसेंटर आणि पैशांची हेराफेरी शक्यच नाही, असेही सपकाळ म्हणाले.

भोंदूबाबा अशोक खरातशी दत्ता कराळे यांचे संबंध असल्याचे व्हिडीओ नुकतेच प्रसार माध्यमांमध्ये दिसले. हे दत्ता कराळे तसेच पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील आणि सोमनाथ घार्गे या दोघांचाही बोगस कॉल सेंटरच्या रॅकेटशी संबंध असल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे. सीबीआयने ८ ऑगस्ट २०२५ आणि ११ सप्टेंबर २०२५ रोजी नोंदवलेल्या एफआयआरनुसार नाशिक आणि इगतपुरी येथे छापे टाकून बोगस कॉल सेंटर रॅकेट चालवणाऱ्यांना अटक केली. सीबीआयला इगतपुरीत सुरु असलेल्या बोगस कॉल सेंटरची माहिती मिळाली आणि कारवाई झाली. पण बोगस कॉल सेंटरचा सुगावा महाराष्ट्र पोलीसांना का लागला नाही?असा सवाल सपकाळ यांनी यावेळी केला.

यापूर्वी कराळेंसह दोन्ही अधिकारी ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांमध्ये कार्यरत होते. तेव्हा हे कॉल सेंटर तिथे सुरु होते. पोलिसांनी या कॉलसेंटरवर छापा टाकला आणि नंतर संदीप सिंह, विशाल यादव या आरोपींना जुजबी कारवाई करून सोडून दिले. या तिन्ही अधिकाऱ्यांची नाशिक परिक्षेत्रात बदली झाल्यावर या आरोपींना हाताशी धरून कॉल सेंटर सुरु करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. विशेष हे म्हणजे हे सर्व आरोपी ठाणे, रायगड आणि पालघर परिसरातील रहिवाशी आहेत. पूर्वी या तिन्ही वरिष्ठ पोलीस अधिका-यांची पदस्थापना याच भागात होती आणि बोगस कॉलसेंटरही याच भागात सुरु होते, याकडे सपकाळ यांनी लक्ष वेधले.

सीबीआय मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक अमित वसावा यांनी ११ सप्टेंबर २०२५ रोजी दाखल केलेल्या एआयआरमधील नोंदीनुसार हे बोगस कॉल सेंटर सुरळीत चालू देण्यासाठी आरोपी गणेश कामनकर आणि त्याच्या भाऊ हे वरिष्ठ अधिकाऱ्याना मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, सोने आणि क्रिप्टो करन्सीच्या रुपात लाभ देत होते. राज्य सरकारला याची संपूर्ण माहिती असतानाही या अधिका-यांवर अद्याप कारवाई का केली नाही ? असा प्रश्न करत सपकाळ यांनी पोलीस अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली.

मुख्यमंत्र्यांनी बारामतीप्रमाणे परंपरेचे पालन करावे

दरम्यान, विधान परिषद निवडणुकीत जर उद्धव ठाकरे उमेदवारी करणार नसतील तर काँग्रेस पक्षाला उदेवारी द्यावी, अशी आमची भूमिका आहे. विधान परिषदेची एक जागा ही काँग्रेसचे नेते राजीव सातव यांची होती. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी प्रज्ञा सातव यांना काँग्रेसने उमेदवारी दिली . पण त्यांनी राजीनामा दिला. आता त्या जागेवर होणाऱ्या पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवाराला बिनविरोध निवडून दिले पाहिजे. यासाठी मुख्यमंत्र्यांनी बारामतीप्रमाणे संस्कृती आणि परंपरेचे पालन करावे, असे आवाहन सपकाळ यांनी यावेळी केले.

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेत ॲग्रीबिझनेस अभ्यासक्रम सुरू

मुंबई, प्रतिनिधी

सहकार, पणन आणि कृषी व्यवसाय क्षेत्रासाठी प्रशिक्षित व सक्षम मनुष्यबळ तयार करण्याच्या दृष्टीने पुणे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (एनआयपीएचटी) येथे आता बीबीए इन ॲग्रीबिझनेस हा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमाला त्रिभुवन सहकारी विद्यापीठाने मान्यता दिली असून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून ६० प्रवेशक्षमतेची प्रवेश प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

मंत्रालयात आयोजित राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेच्या आढावा बैठकीत पणन मंत्री जयकुमार रावल बोलत होते. यावेळी सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहसचिव विजय लहाने, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, संस्थेचे संचालक मिलिंद आकरे, मॅग्नेट प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव आदी अधिकारी उपस्थित होते.

मंत्री रावल म्हणाले, या नव्या अभ्यासक्रमामुळे सहकार, कृषी प्रक्रिया, बाजार व्यवस्थापन, पुरवठा साखळी, कृषी उद्योग आणि ग्रामीण उद्योजकता या क्षेत्रांसाठी प्रशिक्षित तरुण तयार होतील. पणन आणि सहकार क्षेत्रात आधुनिक व्यवस्थापन कौशल्य असलेल्या युवकांची गरज असून त्यासाठी एनआयपीएचटीने जागतिक तंत्रज्ञानाच्या धर्तीवर गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण द्यावे. वर्षभर विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

त्रिभुवन सहकारी विद्यापीठाने तीन वर्षांच्या कालावधीसाठी 60 प्रवेश क्षमतेसह हा अभ्यासक्रम मंजूर केला असून त्यामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी कृषी व्यवसाय व्यवस्थापनाचे नवे दालन खुले होणार आहे.

राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक आणि प्राध्यापकांसाठी प्रशिक्षण अनिवार्य

मुंबई, प्रतिनिधी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दिशेने राज्यात महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील 'ऑनर्स' व 'ऑनर्स विथ रिसर्च'च्या चौथ्या वर्षाच्या अंमलबजावणीसंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि उच्च शिक्षण संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील सर्व वरिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक, प्राध्यापकांसाठी तीन दिवसीय विशेष ऑनलाईन प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले आहे. त्यामध्ये सर्व संबंधितांचा सहभाग अनिवार्य राहणार असल्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात आघाडीवर असून, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून राज्यात चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील चौथे वर्ष लागू होत आहे. या नव्या टप्प्याची प्रभावी आणि एकसमान अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. उच्च शिक्षण व्यवस्थेत लवचिकता, संशोधनाभिमुखता आणि विद्यार्थी-केंद्रितता वाढविण्यासाठी ही पुनर्रचना अत्यंत महत्त्वाची असल्याचे मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी नमूद केले.

'क्रेडिट फ्रेमवर्क', 'मल्टिपल एंट्री अँड एक्झिट' आणि 'अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्स (एबीसी)' यांसारख्या तांत्रिक बाबींचे सखोल ज्ञान संस्थाप्रमुखांना व्हावे, तसेच अंमलबजावणीत कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी हे प्रशिक्षण सक्तीचे करण्यात आले असून सातत्याने प्रशिक्षण घेण्यात येणार असल्याचेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी स्पष्ट केले.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार, राज्यातील सर्व विद्यापीठे तसेच संलग्न आणि स्वायत्त महाविद्यालयांमध्ये आगामी शैक्षणिक वर्षापासून चौथे वर्ष लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर महाविद्यालयांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

या नव्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदेचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे नमूद करून मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी महासार्कचे अध्यक्ष प्रा. डॉ. रवींद्र कुलकर्णी आणि त्यांच्या टीमचे अभिनंदन केले. चर्चासत्रात महासार्कचे अध्यक्ष तथा मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी चौथ्या वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या तांत्रिक व प्रशासकीय अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या चर्चासत्रास उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, राज्य सुकाणू समितीचे सदस्य प्रा. डॉ. रवींद्र कुलकर्णी, तसेच राज्यातील सर्व वरिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उच्च शिक्षण संचालक प्रा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी प्रास्ताविक करून समारोपप्रसंगी सर्वांचे आभार मानले.

एशियाटिक सोसायटीच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा

निवडणूक प्रक्रियेचा आराखडा सादर करण्याचे हायकोर्टाचे निर्देश

मुंबई, प्रतिनिधी

एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईच्या निवडणुकीचा मार्ग अखेर हायकोर्टाच्या मध्यस्थीने मोकळा झाला आहे. न्या. फरहान दुभाष यांच्या एकलपिठाने निवडणूक घेण्यासंदर्भात कायद्याचा किस काढण्यापेक्षा व्यावहारिक दृष्टिकोन बाळगून नव्याने निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याचा मध्यममार्ग काढण्याचा सल्ला राज्य सरकार आणि याचिकाकर्त्यांना दिला. तो दोघांनीही मान्य केला. त्यानुसार या निवडणूक प्रक्रियेचा कालबद्ध आराखडा सादर करण्याचे आदेश देत सुनावणी तहकूब ठेवली.

एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईच्या १४ मार्चला होऊ घातलेल्या निवडणूकीला स्थगिती देताना नव्याने वैध व पात्र मतदारांची यादी तयार करण्यासाठी उपसमित्या स्थापन करण्याच्या आदेश दिले होते. या आदेशा विरोधात अध्यक्षपदाचे उमेदवार कुमार केतकर, विश्वस्त विश्वास उटगी, शिंदे व स्वाती दाते यांनी ॲड. स्वरूप पाटील यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल केली आहे.

या याचिकेवर आज गुरुवारी न्यायमूर्ती फरहान दुभाष यांच्या एकलपिठासमोर सुनावणी झाली. मागील सुनावणीच्या वेळी न्यायालयाने धर्मदाय आयुक्तांच्या निर्णयाला अंतरीम स्थगिती देत धर्मादाय आयुक्तांना याचिकेत उपस्थित मुद्यावर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार राज्य सरकारच्या वतीने ॲडव्होकेट जनरल मिलिंद साठे यांनी आयक्तांच्या निर्णयाचे समर्थ केले.

सोसायटीच्या पडताळणी समितीची मुदत या पूर्वीच संपल्याने नव्या सभासदांची पडताळणी करण्याचा अधिकार या समितीला नाही. व्यवहारांमध्ये अनियमितता तसेच सोसायटीच्या असल्याची शासनदरबारी दखल घेण्यात आली होती व चौकशीचे आदेश देण्यात आले होते. तो अहवाल धर्मादाय आयुक्तांकडे प्राप्त झाल्यानंतर निवडणुकीला स्थगिती आदेश देताना निर्णय घेतला गेला. तसेच वैध व पात्र मतदारांची यादी तयार करण्यासह सोसायटीचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी समिती नेमन्यात आली. त्याचप्रमाणे, मतदारयादी अंतिम करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याचे स्पष्ट केले होते, अशी माहिती ॲडव्होकेट जनरल मिलिंद साठे यांनी न्यायलयाला दिली.

राज्य सरकारच्या भूमिकेवर याचिकाकर्त्यांच्यावतीने ॲड. अतुल दामले यांनी जोरदार आक्षेप घेतला. हा अहवाल आपल्याला उपलब्ध करण्यात आला नाही आणि निवडणुकीला स्थगिती देताना आपले म्हणणे ऐकले गेले नाही, असा दावा केला. याची दखल घेत न्यायालयाने निवडणूक कायद्याचा किस काढण्यापेक्षा व्यावहारिक दृष्टिकोन बाळगून नव्याने निवडणूक प्रक्रिया सुरु करण्याचा मध्यममार्ग काढण्याचा सल्ला राज्य सरकार आणि याचिकाकर्त्यांना दिला.

लोकलमधून पडल्याने तरुणाचा मृत्यू आईला ४ लाख भरपाई

उच्च न्यायालयाचा मध्य रेल्वेला दणका

मुंबई, प्रतिनिधी

१६ वर्षांपूर्वी लोकलमधून पडून अपघाती मृत्यू झालेल्या तरुणाच्या आईला गुरुवारी उच्च न्यायालयाने दिलासा दिला. तरुणाचा अपघाती मृत्यू दुर्दैवी घटना असल्याचे निरिक्षण

न्या. जितेंद्र जैन यांनी नोंदवले. त्याच आधारे न्यायालयाने विक्रोळीतील तरुणाच्या आईला ४ लाख रुपयांची भरपाई मंजूर केली. रेल्वे प्रशासनाने भरपाईची रक्कम दोन महिन्यांत याचिकाकर्त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचे आदेश दिले.

२४ सप्टेंबर २०१० रोजी श्रीनिवास कोमुरावेली हा तरुण डॉकयार्ड रोड ते विक्रोळी असा प्रवास करीत होता. शिवडी रेल्वे स्थानकाजवळ तरुणाचा अपघाताचा मृत्यू झाला. रेल्वे दावा न्यायाधिकरणाने तरुण रुळ ओलांडत होता. त्यादरम्यान त्याचा मृत्यू झाला असावा, असा संशय व्यक्त करत नुकसान भरपाईचा दावा फेटाळला होता. न्यायाधिकरणाच्या निर्णयाविरोधात मृत तरुणाच्या

पालकांनी उच्च न्यायालयात दाद मागितली होती. याप्रकरणी न्या. जितेंद्र जैन यांच्या एकलपीठाने सुनावणी घेतली आणि महत्त्वपूर्ण निर्णय दिला. मृत तरुणाकडे विक्रोळी ते डॉकयार्ड रोड प्रवासाचे वैध तिकीट सापडले होते. त्यामुळे तो वैध प्रवासी होता हे सिद्ध होते. तरुण रुळ ओलांडत असताना अपघात झाला, हे सिद्ध करण्यासाठी रेल्वेने कोणत्याही प्रत्यक्षदर्शीची किंवा मोटरमनची साक्ष नोंदवली नाही, असे नमूद करीत न्यायालयाने मृत तरुणाच्या आईला ४ लाखांची भरपाई मंजूर केली.

प्रकरण प्रलंबित असताना मृत तरुणाच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे न्यायालयाने आता केवळ आईला ४ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले.

मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत लता-आशा मंगेशकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसचा कोनशिला समारंभ संपन्न

पुणे, प्रतिनिधी

लता-आशा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस रुग्णालय प्रकल्पात रुग्णांवर उपचार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत. या कार्यात अनेक व्यक्ती मदत करीत आहेत. शासनदेखील अशा धर्मादाय प्रकल्पांना सहकार्य करण्याचा प्रयत्न करेल. रुग्णालयाकडे येण्यासाठी पुरेशा रुंदीचा रस्ता आणि पाण्याची सुविधा महानगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात येईल. धर्मादाय संस्थांच्या इमारतींना परवानगी देताना आकारल्या जाणाऱ्या प्रीमियमवर काही प्रमाणात सूट देण्याचा विचारही करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

लता मंगेशकर मेडीकल फाऊंडेशनच्या वतीने नांदोशी येथे उभारण्यात येणाऱ्या 'लता-आशा मंगेशकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस' या रुग्णालय प्रकल्पाच्या कोनशिला समारंभात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महापौर मंजुषा नागपुरे, सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, लता मंगेशकर मेडिकल फाऊंडेशनचे अध्यक्ष पं. हृदयनाथ मंगेशकर, ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर आदी उपस्थित होते.

